CMYK

आयपीएल सामना क्र.४५

गुजरात टायटन्स विरुद्ध
लखनौ सुपर जायंट

वेळ : दुपारी.३.३० वा. स्थळ : गुजराज

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.४६

राजस्थान रॉयल्स
विरुद्ध सनराईज हैदराबाद

वेळ : रात्री.७.३० वा. स्थळ : राजस्थान

www.surajyadigital.com | रविवार, दि. ७ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २१७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# निकाल विरोधात गेला तरीही राज्य सरकार टिकणार

## शरद पवारांची भविष्यवाणी



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यातील सत्ता संघर्षावरचा निकाल सुप्रीम कोर्टाकडून या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकार सध्या तणावाखाली असल्याचे सांगण्यात येते. आठ ते बारा मेच्या दरम्यान कोर्टाकडून निकाल जाहीर होण्याचा अंदाज आहे.शिंदे गटाचे सोळा आमदार न्यायालयाच्या निकालात अपात्र ठरले तर शिंदे-फडणवीस सरकार कोसळेल, असे सांगितले जात आहे परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी तर वेगळीच भविष्यवाणी केली आहे. कोर्टाचा निकाल जरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात लागला तरी सरकारवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. कारण भाजप आणि शिंदे सरकारकडे बहुमत आहे, त्यामुळे सरकार कोसळेल, असे आपल्याला वाटत नाही,अशा शब्दात पवारांनी निर्वाळा देवून शिंदे-फडणवीस सरकारला अभय दिले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्याचा निर्णय मागे घेतल्यानंतर पवार हे शनिवारी प्रथमच आपली मायभूमी बारामतीत आले होते. त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हे भाकीत वर्तविले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासाठी आता फक्त चार ते पाच तारखा उरल्या आहेत. यामध्ये ८ ते १२ मे या कालावधीत सत्तासंघर्षाचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढचा आठवडा महाराष्ट्राच्या राजकारणाची भविष्यातली दिशा ठरवण्यासाठी महत्वाचा ठरू शकतो, अशी चर्चा आहे. या पार्श्वभूमीवरच ८ ते १२ मे या कालावधीतील तारखांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. तसेच कायदेतज्ज्ञांच्या वर्तुळामध्येही अशीच चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल काय येणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्य १५ आमदारांना अपात्र ठरवण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात अनेक दिवस सुनावणी सुरू होती. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने याबाबतचा निर्णय राखून ठेवलेला आहे.शिवसेनेत बंड झाल्यानंतर राज्यात अनेक राजकिय घडामोडी घडल्या. त्यानंतर राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आलं. तर दुसरीकडे जवळपास २६ जून २०२२ पासून महाराष्ट्रातील सत्तासंघर्षासंदर्भातच्या प्रकरणावर सर्वोच न्यायालयात सुनावणी सुरु होती.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर १४ फेब्रुवारी ते १६ मार्च सलग सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाचा निकाल राखीव ठेवला. त्यामुळे आता पुढच्या आठवड्यात तरी हा निकाल लागणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पुढचा आठवडा महाराष्ट्राच्या राजकारणाची भविष्यातली दिशा ठरवण्यासाठी महत्वाचा असणार आहे, अशी चर्चा आहे. तसेच सध्या राज्यातील राजकिय घडामोडींना देखील वेग येत आहे. त्यामुळे सत्तासंघर्षाचा निकाल लवकरच समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### आज सोलापूरला पदस्पर्श...

अध्यक्षपदाची धुरा पुनश्च खांद्यावर घेतल्यानंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचा माहोल आहे. अशा वातावरणातच पवार हे रविवारी सोलापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ९ वाजता पंढरपूर येथील श्रीविठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वाढीव बायो सीएनजी प्रकल्पाचे भूमिपूजन करुन ते शेतकरी मेळावा करून सांगोल्याला रवाना होतील. दुपारी ४ वाजता जैविकॉन राजलक्ष्मी ऑरमॅनिक्स ग्रोकल्चर रिसर्च व नॅनॅटिकल सेंसेंटरचे उद्घाटन पवारांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर दुपारी ४.३० वाजता पुण्याच्या कसब्यातील नवे आमदार रविंद्र धंगेकर यांचा सत्कार आटोपून ते सोलापूरला येणार आहेत. सोलापुरात माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या कुटुंबातील विवाह सोहळ्याला उपस्थित राहिल्यानंतर पवार यांचा शासकीय विश्राम् सोलापुरात मुक्काम असणार आहे. त्यानंतर सोमवारी सकाळी ते कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्रचाराला विजयपूरकडे रवाना होतील.

### स्वागताची जय्यत तयारी..

राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवारांच्या अध्यक्षपदाच्या राजीनाट्यानंतर ते प्रथमच सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या स्वागताची पंढरपूर, सांगोला व सोलापूर येथे कार्यकर्त्यांने जय्यत तयारी सुरु केली आहे. पंढरपूर येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात श्री विठ्ठल साखर कारखान्याचे चेअमरन अभिजित पाटील हे पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीची घड्याळ आती बांधतील काय?, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विठुरायाच्या पगारी सेवेसाठी अखेर मिळाला पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी

**तब्बल वीस महिन्यानंतर शोध पूर्ण; राजेंद्र शेळके यांची नेमणूक**

सुराज्य/पंढरपूर

तब्बल वीस महिन्यानंतर पंढरीच्या श्री विठुरायाला पगारी सेवेसाठी अखेर पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी मिळाला आहे. नांदेडमधील धर्माबाद इथे कार्यरत असणाऱ्या राजेंद्र शेळके यांची विठ्ठल मंदिरात पूर्णवेळ कार्यकारी अधिकारी म्हणूने नेमणूक करण्यात आली आहे.







विठुरायाच्या दर्शनासाठी वर्षभरातील देशभरातून लाखो भाविक येथे येत असतात. मंदिर समितीचा कार्यकारी अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीवर येण्यासाठी मात्र गेल्या अनेक महिन्यापासून एकही अधिकारी पुढे यायला तयार नसल्याचे समोर आले होते. मंदिर समिती ही विधी व न्याय विभागाकडे असून यासाठी प्रत्येक वेळी महसूल विभागाकडे उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याला प्रतिनियुक्तीवर पाठवावे लागते. गेल्या अनेक महिन्यांपासून हे पद रिक्त होते. त्यामुळे वारंवार पंढरपूरच्या प्रांताधिकाऱ्याकडे याचा पदभार दिला जात होता.

यापूर्वी ९ सप्टेंबर २०२१ रोजी तत्कालीन कार्यकारी अधिकारी सुनील जोशी यांच्या प्रतिनियुक्तीचा दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर मंदिर समितीला नियमित कार्यकारी अधिकारी मिळालेलाच नव्हता. आता तब्बल २० महिन्यानंतर विठुरायाच्या मंदिरात सेवा करण्यासाठी राजेंद्र शेळके लवकरच रुजू होणार आहेत.

सध्या राज्यातील शिंदे सरकारने विठ्ठल मंदिर विकास प्रकल्प या ७३ कोटींच्या आराखड्याला मंजुरी दिली आहे. हा महत्त्वाकांक्षी आराखडा व्यवस्थित राबवण्यासाठी शासनाला याठिकाणी पूर्णवेळ उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी मंदिराचा कार्यकारी अधिकारी म्हणून पाहिजे होता. मंदिरातील प्रशासन संपूर्णपणे कोलमडून गेल्याने पूर्णवेळ कार्यकारी अधिकाऱ्याची गरज होती.

यात सध्या पदभार असणाऱ्या तुषार ठोंबरे या अधिकाऱ्याने मंदिरातील कर्मचाऱ्यांच्या तातडीने बदल्या करुन कर्मचाऱ्यांना चाप लावण्याचा प्रयत्न केला होता.

### ही असणार आव्हाने

मंदिराला शिस्त लावून भाविकांच्या गैरसोयी दूर करणे, भाविकांच्या विकासाच्या योजनांना गती देणे आणि ७३ कोटीच्या मंदिर विकास आराखड्याची सुरुवात करणे ही प्रमुख आव्हाने शेळके यांच्या समोर असणार आहेत.

**विजयपूर शहर हादरले**

# व्यावसायिकाची भर दिवसा गोळ्या झाडून हत्या

सुराज्य/विजयपूर



कर्नाटकात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना सोलापूरच्या शेजारी असलेले विजयपूर शहर हादरून गेले.शनिवारी सकाळी सकाळी एका तरूणावर अंधाधुंद गोळीबार करून त्याची हत्या करण्यात आली.हा प्रकार समजताच पोलीस दल हादरून गेले.

हैदरअली नदाफ असे या तरूणाचे नाव आहे.हैदरअली हा चांदपूर कॉलनीजवळ राहाता होता.तो आपली कार घेवून घराबाहेर पडल्यानंतर चार ते पाच तरूण दुचाकीवर त्याठिकाणी आले. पहिल्यांदा त्याची कार अडवण्यात आली. त्यानंतर त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या.आपला जीव वाचवण्यासाठी तो पळत होता.त्याचवेळी चौघांच्या टोळीतील काही तरूणांनी त्याचा पाठलाग करून गोळ्या झाडल्या.त्यात गंभीर जखमी होवून तो जागेवरच मरण पावला. हा प्रकार घडल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.संपूर्ण कॉलनीत सन्नाटा पसरला.ही खबर मिळताच पोलीस घटनास्थळी आले. ज्या ठिकाणी हैदरअली नदाफचा मृतदेह पडला होता, त्या ठिकाणी दोन गोळ्या पोलिसांना सापडल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक एच.डी. आनंदकुमार व आर्दींनी भेट देऊन तपासणी केली आहे. जलनगर पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

अलिकडेच झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत वार्ड क्रमांक १९ मधून हैदर अली नदाफ याने आपली पत्नी निशात नदाफ यांना अपक्ष म्हणून उभे केले होते. त्यात त्यांनी विजय मिळवला होता. तो रिअल इस्टेट व्यवसायात करीत होता असे समजते. हल्ल्याचे नेमके कारण समजू शकलेले नाही.पण आर्थिक व्यवहारातून हा प्रकार झाला आहे काय? याचा तपास पोलीस करत आहेत.

# नरखेड येथील मंदिरातून एसीची चोरी

सुराज्य/मोहोळ

नरखेड येथील सिध्देश्वर मंदिरातील हजार रुपये किमतीचा वातानुकूलित एसी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या चीं घटना ४ मे रोजी सकाळी उघडकीस आली . महिनाभरापूर्वीच एका भक्ताने मंदिरामध्ये एसी लावला होता . दरम्यान याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत भाऊराव माधवराव पाटील ( वय ५३ रा नरखेड ता. मोहोळ) यांनी चोरीची फिर्याद दिली असून फिर्यादी हे सदर मंदिराचे चेअरमन आहेत . मोहोळ येथील भक्त हरिश्चंद्र बावकर यांनी सदर मंदिराच्या गाभाऱ्यात १२ एप्रिल रोजी वातानुकुलित एसी बसविला होता.

सदर मंदिराचा दरवाजा रात्री उघडाच असतो याची संधी साधून अज्ञात चोरट्याने उघड्या दारातून प्रवेश करून मंदिराच्या गाभाऱ्यातील सदरचा एसी ४ मे रोजी रात्रीतून चोरून नेला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . हवालदार माने हे पुढील तपास करीत आहेत.

# मुलाकडून बापाला बेदम मारहाण ; दोघांवर गुन्हा दाखल

**उपळे दुमाला येथील घटना**

सुराज्य/सोलापूर



माझ्या बायकोला तुझा पोरगा सारखा फोन का करतो ? पोराला नीट समजावून सांग असे म्हणून एका बापाला लाकडाने बेदम मारहाण केल्याची घटना बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला येथे घडली. दरम्यान याप्रकरणी वैराग पोलिस ठाण्यात दोघाजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

ज्ञानेश्वर सौदागर बाकले (वय३० )आणि नवनाथ लोखंडे (वय २८, दोघे रा.उपळे दुमाला ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. राजेंद्र मारुती माने ( वय ५७ रा. सदर ) यांनी मारहाणीची फिर्याद दिली आहे. राजेंद्र हे गुरुवारी संध्याकाळी घरात असताना वरील आरोपींनी त्यांना घराबाहेर बोलावून घेऊन मोटर सायकल वरून गावातील आपल्या शेतात आणले तेथे फिर्यादीस शिवीगाळ केली आणि माझ्या बायकोला तुझा पोरगा सारखा फोन का करतो, पोराला नीट समजावून का सांगत नाहीस असे म्हणून वरील आरोपींनी फिर्यादीला लाकडी काठीने सर्वांगाला मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार नाळे हे पुढील तपास करीत आहेत .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



काका नेहमी असंच करतात

कल्याण
240-62-589

# टाटांच्या गाड्यांमध्ये मराठमोळ्या इंजिनिअरचा पार्ट असणार

## राज्यात सोलापूरचा लौकिक वाढला

## कोट्यवधी रुपये मोजत पेटंटची खरेदी

सुराज्य/सोलापूर

युवा संशोधक आणि इंजिनिअर राहुल बुऱ्हाणपुरे यांनी सोलापूरचा लौकिक वाढवला आहे. राहुल यांनी सुरुवातीच्या काळात एका खासगी गॅरेजमध्ये दुचाकी, चार चाकी गाड्या दुरुस्तीचे काम केले. हे करत असतानाच गाड्यांमध्ये होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी त्यांना कल्पना सुचली. यावर त्यांनी अनेक दिवस संशोधन करून चार चाकी गाड्या मधील प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी एक पार्ट बनवला. त्यांच्या या पार्टमुळे गाड्यामधील होणारे प्रदूषण आता कमी होणार आहे. चार चाकी वाहन क्षेत्रात त्यांनी केलेले पेटंट टाटा कंपनीने तब्बल साडेतेरा कोटी रुपयांना विकत घेतले आहे.

शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत राहुल बुऱ्हाणपुरे आणि त्यांच्या मित्रमंडळींनी याबाबत माहिती दिली.

राहुल बुऱ्हाणपुरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी पदवी प्राप्त केली. वडील साडीच्या दुकानात कर्मचारी तर आई गृहिणी अशी घरची स्थिती असतानाही राहुल यांनी सुरुवातीच्या काळात एका खासगी गॅरेजमध्ये दुचाकी, चार चाकी गाड्या दुरुस्तीचे काम केले. हे करत असतानाच गाड्यांमध्ये होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी त्यांना कल्पना सुचली. यावर त्यांनी अनेक दिवस संशोधन करून चार चाकी गाड्या मधील प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी एक पार्ट बनवला. तो चार चाकी वाहन क्षेत्रात त्यानं केलेले पेटंट टाटा कंपनीने तब्बल साडेतेरा कोटी रुपयांना विकत घेतला आहे. टाटा मोटर्स कडून या नवीन पार्टचा वाहनांमध्ये पुढील वर्षापासून वापर होणार आहे, असे राहुल यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत उद्योगपती किशोर चंडक, शिक्षक संपत झळके अतुल बावटणकर ,बसवराज बऱ्हाणपुरे, माऊली झांबरे, चन्नवीर चिटे आदी उपस्थित होते.



### टाटा कंपनीला पार्ट दिला

राहुल बुऱ्हाणपुरे यांना तीन ते चार कंपन्यांनी संपर्क साधला आणि या पेटंटची मागणी केली होती. टाटा मोटर्स कंपनी ही देशी कंपनी आहे आणि टाटा कंपनीचं देश कार्यात नेहमीच अधिक योगदान असते म्हणून याच कंपनीला त्यात राहुल बुऱ्हाणपुरे यांनी आपलं पेटंट दिले.

### प्रदूषण नियंत्रण करणारा पार्ट तयार केला

सध्याच्या वाहनांमध्ये इ.जी.आर सिस्टमचा वापर केला जातो. या पार्टचे काम प्रभावीपणे होण्यासाठी पीसीएम या सेंसरद्वारे हा पार्ट नियंत्रित केला जातो. सायलेन्सरमधून बाहेर फेकली जाणारी ३० टक्के प्रदूषित हवा या पार्टमुळे पुन्हा रिसायकल होऊन इंजिन मध्ये सोडली जाते. यामुळे प्रदूषणात ३० टक्के एवढी घट होईल, याशिवाय इंधनाची ही १० टक्के बचत होते, असं राहुल बुऱ्हाणपुरे यांनी सांगितले.

CMYK

# मुंबईची विजयाची हॅट्रिक रोखली, चेन्नईचा ६ विकेटस्ने विजय



✔ सुराज्य/चेन्नई

**चेपॉक स्टेडियमवर झालेल्या एकतर्फी सामन्यात चेन्नईने आपला सर्वात मोठा प्रतिस्पर्धी मुंबई इंडियन्सचा ६ गडी राखून पराभव केला. सलग दोन सामन्यांत २०० हून अधिक धावसंख्येचा पाठलाग करण्यात यशस्वी ठरलेल्या मुंबई संघाला प्रथम फलंदाजी करताना केवळ १३९ धावा करता आल्या, जे चेन्नईसाठी फारसे अवघड नव्हते. यासह सीएसकेने सहाव्या विजयाची नोंद केली आहे.**

चेन्नई सुपर किंग्ज नेहमीच चेपॉकच्या त्यांच्या घरच्या मैदानावर असले तरी त्यांना मुंबई इंडियन्सविरुद्ध बराच काळ विजय मिळवता आला नाही. शेवटच्या वेळी २०१० मध्ये चेन्नईने चेपॉकमध्ये मुंबईचा पराभव केला होता. त्यानंतर सलग ६ वेळा केवळ मुंबईला विजय मिळवला. या विजयासह चेन्नईची १३ वर्षांची प्रतीक्षा अखेर संपली.

चेन्नईसाठी, ऋतुराज गायकवाड आणि डेव्हॉन कॉनवे या फॉर्मात असलेल्या जोडीने पुन्हा एकदा वेगवान सुरुवात करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. दोघांनी ४ षटकात केवळ ४६ धावा केल्या होत्या. पाचव्या षटकात गायकवाड बाद झाला. दुसरीकडे अजिंक्य रहाणेने येऊन संघाला मजबूत केले.

## पाथिरानाचे तीन बळी

शिवम दुबे येताच त्याने आपल्या शैलीत मोठे फटके मारले आणि षटकार ठोकले. दुसरीकडे, कॉनवेला यावेळी मोठी खेळी करता आली नाही, मात्र त्याने ४४ धावा करत संघाचा विजय निश्चित केला. तो १७ व्या षटकात बाद झाला आणि तोपर्यंत संघाने १३० धावा केल्या होत्या. कॉनवेची विकेट पडल्यानंतर कर्णधार एमएस धोनी क्रिजवर आला आणि चेन्नईच्या चाहत्यांसमोर त्याने एक धाव घेत संघाला विजयापर्यंत नेले.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने निर्धारित २० षटकांत आठ गडी गमावून केवळ १३९ धावा करता आल्या. मुंबईकडून नेहल वढेराने सर्वाधिक ६४ धावा केल्या. त्याचवेळी सूर्यकुमारने २६ आणि ट्रिस्टन स्टब्सने २० धावा केल्या. या तिघांव्यतिरिक्त एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. चेन्नईकडून मथिशा पाथिरानाने सर्वाधिक तीन तर दीपक चहर आणि तुषार देशपांडे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. रवींद्र जडेजाने एक विकेट मिळाली.

---



## आचेगाव जि. प. शाळेत शाहू महाराज यांचा स्मृतीदिन

✔ **सुराज्य/द. सोलापूर** : आचेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजर्षी शाहू महाराज यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. यावेळी राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन शिक्षक इमाम पटेल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अशोक सोलापूरे यांनी ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य व बहुजन जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केल्याचे सांगितले. या वेळी कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश गोतसुर्वे, इरफान पाटील, चंदू शिलेनी, मनोहर पोतदार, मुख्यद्यापक राजशेखर कोळी , शिक्षक शिवानंद भिमण्णवरू, अशोक सोलापुरे नागनाथ पोतदार, शिक्षिका प्रतिभा दूधगी, उर्मिला सर्जे, गौराबाई बगले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक शिवानंद भिमण्णवरू यांनी केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना निकाल देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आले. यावेळी शिक्षक-शिक्षिका, गावकरी उपस्थित होते.

## ऑलिंपियाड स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

✔ सुराज्य/मोडनिंब



सिल्वरझोन फाउंडेशन, नवी दिल्ली या संस्थेने आयोजित केलेल्या ऑलिंपियाड स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव आंदेवाडी (खुर्द) जिल्हा परिषद शाळा येथे आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत गोपाळ नाशिवाले हे होते. मंगरूळ केंद्राचे केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी यशस्वी विद्यार्थी दिशा अर्जुन कामाठी, गायत्री लक्ष्मण कामनुरकर, मारुती शिवाजी पवार, विनोद लक्ष्मण कामनुरकर, दयानंद विजयकुमार नाशिवाले, दत्तात्रय शिवाजी पवार, विराट लक्ष्मण कामाठी या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. गौरव समारंभास रामचंद्र कामुनूरकर, माजी पोलीस पाटील सिद्राम कामाठी, तंटामुक्तीचे अध्यक्ष शमशुद्दीन पटेल, ग्रामपंचायत सदस्य यल्लप्पा कामाठी, अंगणवाडी सेविका कविता कामाठी तसेच ग्रामस्थ सुरेश कामाठी, पवार, नाशिवाले उपस्थित होते.

शाळेने मिळवलेल्या या यशाबद्दल केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे यांनी कौतुक केले. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या शिक्षणाच्या दशसूत्रीप्रमाणे गुणवंत व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक प्रयत्न करीत असल्याबद्दल केंद्रप्रमुखांच्या हस्ते शिक्षकांचा गौरव करण्यात आला तसेच मागील वर्षी शाळेतील एक विद्यार्थिनी दिव्या कामाठी हिला इयत्ता पाचवी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी कुडल येथील शाळेत जाण्यासाठी सायकलची गरज होती. शाळेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब कुंभार यांनी आर्थिक मदत करून पालकांच्या सहयोगाने मुलीला सायकल बँक या उपक्रमाचा लाभ मिळवून दिला व सर्व मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे कार्य केले. या उत्कृष्ट कार्याबद्दल गटशिक्षणाधिकारी कुदसिया शेख व विस्तार अधिकारी हरिश्चंद्र गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे.

## बेकायदा कत्तलीसाठी जाणारी जनावरे पकडली

✔ सुराज्य/सोलापूर

बेकायदा कत्तली करण्यासाठी जनावरे घेऊन जाणाऱ्यांचा पाठलाग करून पोलिसांनी दोघांना पकडले. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्‍व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी ही कामगिरी केली.

पुणे रोडवरून सोलापूरच्या दिशेने बेकायदा कत्तलीसाठी जनावरे येत असल्याची माहिती हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यत्यांना मिळाली होती. पुणे महामार्गावरील सावळेश्वर येथे सापळा रचण्यात आला होता. माहितीनुसार एक पिकअप वाहन (क्र. एमएच-४५ टी-३३९८) हे वाहन वेगात येताना दिसले, गोरक्षकांनी त्याला आडवण्याचा प्रयत्न केला. वाहन वेगात पुढे निघून गेले, त्यामुळे गोरक्षकांनी त्याचा पाठलाग सुरू केला. दरम्यान कार्यकर्त्यांनी कंट्रोल रूमशी संपर्क साधून माहिती दिली.

फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलीस तात्काळ बाळे येथे येऊन थांबले. गोरक्षक आणि पोलिसांनी पाठलाग करून गाडी आडवली. दरम्यान वाहन चालक व किन्नरने गाडी रस्त्याच्या कडेला लावून पळून गेले. गाडीची तपासणी केली असता, त्यात ६ गोवंशाची जनावरे आढळून आले. गाडीतील ६ गोवंशांना अहिंसा गोशाळा येथे सोडून त्यांना जीवदान देण्यात आले. कारवाई यशस्वी करण्यासाठी विश्‍व हिंदू परिषद बजरंग दल धर्मजागरण प्रमुख प्रमोद येलगेटी, पवनकुमार कोमटी, विनायक निक्ते, पवन बल्ला, अविनाश मदनावाले, राहुल लंगडेवाले, कुमार आंबट आदी गोरक्षक उपस्थित होते.



## बोरगाव येथे आधारकार्ड अपडेट कॅम्पचे आयोजन

✔ **सुराज्य/श्रीपूर** : बोरगाव सेक्शन १० (ता. माळशिरस) येथे महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसा निमित्ताने बोरगाव ग्रामपंचायतीचे सदस्य दिलीप मंडवळे यांच्यावतीने दि. ५ मे रोजी बोरगाव वाडीबंगला से १० येथे ग्रामस्थांसाठी मोफत आधार कार्ड डॉक्युमेंट अपडेट कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ज्या लोकांनी २०१५ पूर्वी आधार कार्ड काढलेले आहेत, त्यांनी आधार कार्ड डॉक्युमेंट अपडेट करणे गरजेचे आहे. डॉक्युमेंट अपडेट करण्यासाठी मशीन डाटा ऑपरेटर योगेश जोशी व ओंकार खरे यांनी सहकार्य केले. अपडेट कॅम्पमध्ये ८० ग्रामस्थांनी आपले आधार डॉक्युमेंट अपडेट करून घेऊन सहभाग नोंदवला. आधारकार्ड कॅम्प यशस्वी करण्यासाठी समाधान हाडमोडे, धर्मा वाघमारे, पोपट वाघमारे, गणेश आंबोडकर, संकेत सोनवणे, योगेश मंगरूळे आदींनी परिश्रम घेतले. आभार ग्रामपंचायत सदस्य दिलीप मंडवळे यांनी मानले.

## शेतातील बांधाच्या कारणावरून फावडा व कोयत्याने मारहाण

✔ सुराज्य/मोहोळ

शेतातील बांधाच्या कारणावरून एकाला दोघाजणांनी मिळून फावडा आणि कोयत्याने मारहाण केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील मोरवंची गावात शुक्रवारी दुपारी घडली. अर्जुन कुंडलिक माळी (वय वर्षे ४०, रा. मोरवंची ) असे जखमीचे नाव आहे. त्यांना शुक्रवारी दुपारी तीन वाजता भागाबाई माळी आणि मनोहर माळी यांनी मिळून फावडा आणि कोयत्याने त्यांना मारहाण केली. यात मार लागल्याने त्यांना मोहोळ येथील सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करून सोलापूरातील शासकीय रुग्णालयात निलेश ढगे यांनी दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे .




**घंटागाडीला धडकून दुचाकीस्वार जखमी**

समोरील घंटागाडीला धडकून एक दुचाकी स्वार जखमी झाल्याची घटना पोलीस मुख्यालय येथील अचीवर्स हॉल जवळ शनिवारी सकाळी घडली. नितीन उमेश कैव्यावाले (वय २२, रा. लष्कर) असे त्या जखमी दुचाकीस्वाराचे नाव असून तो शनिवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास अचिव्हर्स हॉल समोरून निघाला असताना समोरील घंटागाडी हात न दाखवता वळल्याने तिला सदर दुचाकीस्वार मागून धडकला. यात जखमी झाल्याने त्याला उपचाराकरिता भाऊ सुमित याने जवळच्याच शासकिय रुग्णालयात दाखल केले.

**तरुणास दगड व लाथाबुक्क्याने मारहाण**

तुझा मुलगा आमच्या दारातून का गेला असे म्हणून एका तरुणाला दगड व लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना माळशिरस तालुक्यातील श्रीपूर येथे नुकतीच घडली. विजय सोपान शिंदे (वय वर्षे ३३, रा. शिवाजीनगर, श्रीपूर) असे मारहाण झालेल्या त्या तरुणाचे नाव असून त्याला २८ एप्रिल रोजी सकाळी राहत्या घराजवळ बंटी चंदनशिवे यांनी दगड व लाथाबुक्क्याने मारहाण केली. सर्वांगास मुक्कामार लागल्याने त्याला अकलूज येथील सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करून येथील शासकिय रुग्णालयात शनिवारी सकाळी वडील सोपान यांनी उपचारासाठी दाखल केले.



## वझरे ग्रामपंचायतीतर्फे माजी सैनिकांचा सत्कार

✔ सुराज्य/नाझरे

वझरे (ता. सांगोला) ग्रामपंचायतची तर्फे माजी सैनिकांचे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी सरपंच प्राजक्ता सरगर या होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून उपसरपंच अंजली यादव व सोनाबाई पाटील ग्रामसेविका नूतन काळे या होत्या.

देशासाठी स्वातंत्र्यसैनिकांचे मोठे योगदान आहे व त्यांच्यामुळे आपण सुरक्षित आहोत. त्यामुळे ग्रामपंचायतीने केलेला सत्कार हा कौतुकास्पद आहे, असे मत प्राचार्य के. वाय. पाटील व शिक्षिका लता पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी मच्छिंद्र पवार, मंगल शिंदे, हनुमंत पुकळे, आबासो कोकरे, विठ्ठल कदम, दत्ता कोकरे, शामराव कोकरे, लक्ष्मण पवार, दत्तात्रय वाकडे, बाबूराव रेड्डी, मारुती पवार, प्रल्हाद कोकरे, कांताबाई गेंड, महादेव पाटील, वसंत कोकरे, मारुती कोकरे, तुकाराम रेड्डी, नारायण वाघमोडे, बाळू रेड्डी या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला

यावेळी माजी सरपंच राजू पाटील, अंकुश पाटील, आनंदा कोकरे, सदाशिव वाघमोडे, रविराज शेटे उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक खंडू गाडेकर तर आभार लक्ष्मण पवार यांनी मानले.



## ग्रामपंचायत गावडी दारफळ येथे शाहू महाराज पुण्यतिथी साजरी

✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : लोकराजा राजश्री शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ग्रामपंचायत दारफळ येथे प्रतिमेचे पूजन सरपंच भारत माळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कल्याण काळे, प्रभाकर पवार, काका सुर्वे, नागेश पवार, परमेश्वर थिटे, शशिकांत पवार, केशव कदम, प्रकाश पवार, नानासाहेब पवार, शिवाजी पवार, शाहू धर्मशाळे, दिगंबर पोफळे, शहाजी माळी, पांडुरंग माळी, मधुकर वाघमारे, कृष्णात क्षीरसागर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माळी यांनी केले.

## मुलींनी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनणे गरजेचे

### स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन

✔ सुराज्य/अकलूज

**मुलींनी मोबाईलचा अतिवापर टाळावा, अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे व शारीरिक आणि मानसिकदृष्टया सक्षम बनावे, असे मत प्रताप क्रीडा मंडळ अकलूजच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले. जिजामाता कन्या प्रशालेच्या वार्षिक निकाल व बक्षीस वितरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या.**



विद्यालयातील शिक्षक कलाप्पा सुर्यवंशी यांच्या सेवपूर्ती निमित्त स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या हस्ते त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी विद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सदस्या गिरीजा उघडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यालयातील शिवांजली पवार हिने शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेत प्रथम क्रमांक मिळविला व युगंधरा रामदासी हिने द्वितीय क्रमांक मिळविला तसेच अर्पिता अजित साबळे हिने एन.एम.एम. एस परीक्षेत यश मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.


यावेळी रोहित माने यांनी आपल्या व्याख्यातून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा उजाळा दिला. प्रवीण गोडसे यांनी वार्षिक निकाल वाचन केले. सुनील कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सुर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमासाठी प्राचार्या सुनीता वाघ, पर्यवेक्षक यशवंत माने-देशमुख, स्थानिक प्रशाला समितीच्या सदस्या मनीषा चव्हाण व गिरीजा उघडे, सूर्यवंशी यांचे कुटुंबीय, पालक, विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्या सुनीता वाघ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री कणबुर यांनी केले.

## रामलीला मैदानावर महासोमयागास प्रारंभ

✔ सुराज्य/अक्कलकोट

तीर्थक्षेत्र गुरुमंदिर अक्कलकोट गुरू मंदिरतर्फे संस्थाप्रमुख डॉ. पुरुषोत्तम महाराज राजिमवाले यांच्या मार्गदर्शनाखाली मआयुरुखत्य महासोमयागास रामलीला मैदान, नेरूळ, मुंबई येथे आयोजित शुभारंभ करण्यात आला आहे.

अत्यंत पवित्र अणि भारलेल्या भक्तिमय वातावरण भाविक मंत्रमुग्ध होत आहेत. साक्षात अक्कलकोट नगरीत स्वामीचरणी असल्याचा भाव अंतरंगी उमटत असल्याचं भक्तगण सांगत आहेत. देशभरातून हजारो भक्तगण यज्ञ दर्शनाचा लाभ घेत आहेत. यज्ञ सेवेत सहभागही देत आहेत. सामुदायिक अग्निहोत्रामध्ये



लोकांची उपस्थिती उल्लेखनीय आहे. या सोहळयाला दि. १ मे सुरू झाले असून ते ६ मे पर्यंत सुरू असणार आहे.

या कार्यक्रमास मान्यवर येथे उपस्थित रहात आहेत. स्वामीभक्त सुप्रसिद्ध चित्रकार शेखर साने चित्रित स्वामींची तैलचित्रे, संजय वेंगुर्लेकरयांच्यातर्फे स्वामींच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. अजित कडकडे, मंदार पारखी, ऋषिकेश रानडे, अवधूत आळंदीकर, मनोज देसाई हे भक्तिसंगीत सादर करत आहेत.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# जिल्हाधिकारीपदाचा पदभार तुषार टोंबरेंकडे

## शंभरकर मसुरीला प्रशिक्षणासाठी जाणार

सुराज्य/सोलापूर

सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर हे 'आयएएस'च्या प्रशिक्षणासाठी मसुरीला रवाना झाले आहेत. या प्रशिक्षणासाठी राज्यातील १८ आयएएस अधिकाऱ्यांची निवड झाली आहे. ८ मे ते २ जून या कालावधीत जिल्हा हे प्रशिक्षण होणार आहे. दरम्यान या कालावधीसाठी सोलापूरच्या




प्रभारी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार अतिरिक्त जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्याकडे देण्यात आला आहे.

मसुरी येथील लालबहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीमध्ये ८ मे ते २ जून या कालावधीत चौथ्या टप्प्यातील प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी देशभरातील आयएएस अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी हे दोन वेळा मसुरी येथे आयएएस प्रशिक्षणासाठी गेले होते. प्रशासनातील जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर झेडपीचे सीईओ दिलीप स्वामी य दोन्ही अधिकाऱ्यांचा तीन वर्षांच कालावधी पूर्ण झाला आहे. राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू झाले आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांची आगामी काळात बदली होऊ शकते, अशी शक्यता व चर्चा असताना जिल्हाधिकारी शंभरकर हे प्रशिक्षणासाठी मसुरीला गेले आहेत.




## शिवराज मकाणे यांना गुणवंत कामगार पुरस्कार

**सोलापूर** : महाराष्ट्र वितरण कंपनीतील विभागातील सोलापूर शाखेत वरिष्ठ तंत्रज्ञ शिवराज माकणे यांना यंदाचा वर्षीचा बारामती परिमंडल विभागातील गुणवंत कामगार म्हणून प्रमाणपत्र आणि समन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. मकाणे यांनी महावितरण कंपनीच्या तांत्रिक विभागात कम करत आहेत. सन २०२२-२३ मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे हा गौरव करण्यात आला आहे. अविरत विना अपघात सेवा दिली. सुरळीत वीज सेवा, रोहित्रांची काळजी, अचानक निर्माण झालेल्या तांत्रिक समस्येचे त्वरीत निकारण करणे, कामाच्या ठिकाणी कर्तव्यदक्षता, निष्ठा, श्रम, दाखवत केलेल्या सेवे मुळे हा गौरव करण्यात आला आहे.

## रिक्षाचा अपघात; जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : पिकअप आणि रिक्षाच्या अपघातामध्ये जखमी झालेल्या प्रवाशाचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी पहाटे मृत्यू झाला. अजिनाथ कालिदास गोडसे (वय ५३ रा. येवती ता. मोहोळ) असे मयत झालेल्या रिक्षातील प्रवाशाचे नाव आहे मयत गोडसे हे ३ एप्रिल रोजी दुपारी रिक्षातून सोलापूर ते मोहोळ असा प्रवास करीत होते. टाटा मोटर्स शोरूम समोर पिकअप वाहनाने रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिली होती . त्यावेळी रिक्षा पलटी होऊन गोडसे हे जखमी झाले होते. त्यांना उपचाराकरिता सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करून पुढील उपचाराकरिता खाजगी दवाखान्यात नेले होते. अशी नोंद फौजदार चावडी पोलीसात झाली आहे.

## शरद पवारांनी राजीनामा माघारी घेतला

# शहर राष्ट्रवादीचा जल्लोष, सर्व पदाधिकारी पुन्हा एकवटले

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा मागे घेतल्यामुळे सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शहर कार्यालय जवळ मिठाई वाटून फटाके उडवून आनंद साजरा करत जल्लोष केला.

पवार यांनी अध्यक्ष पद सोडत असल्याचा निर्णय जाहीर करताच कार्यकर्त्यांमध्ये असंतोष पसरला होता. त्यांनी आपला निर्णय मागे घ्यावा यासाठी सोलापूरात देखील आंदोलन करण्यात आले होते. राज्यभरात उमटलेले पडसाद पाहता पवार यांनी अध्यक्षपदाचा राजीनाम परत घेतल्याने राज्यभर जल्लोष केला जात आहे. त्यांचा एक




भाग म्हणून सोलापूर शहर राष्ट्रवादीच्या वतीने जल्लोष करण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष भारत जाधव, प्रमोद गायकवाड, महेश कोठे, संतोष पवार,महेश गादेकर, जनार्दन कारमपुरी, शंकर पाटील, यु एन बेरिया, सुधीर खटमल, राजन जाधव, शफी इनामदार, दिनेश शिंदे, प्रमोद भोसले, नलिनी चंदिले, सुनीता रोटे, जुबेर बागवान, लता फुटाणे, लता ढेरे, चंद्रकांत पवार, बिस्मिल्ला शिकलगार, संगीता जोगधनकर,गौरा कोरे, विजय भोईटे, अमीर शेख, मिलिंद गोरे, इरफान शेख, हेमंत चौधरी, जावेद शिकलगार, दादाराव रोटे, बसू कोळी, सिया मुलानी,संगीता गायकवाड, नसीमा पठाण, शशिकला कस्पटे, शशिकला डंकापुरे, प्रतीक्षा चव्हाण, सुरेखा घाडगे, रेखा सपाटे, संजय कुराडे, महिपती पवार, रुपेश भोसले, नागेश निंबाळकर, निशांत साळवे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.












## हिराचंद नेमचंद वाचनालयात शाहू महाराजांना अभिवादन

**सोलापूर** : हिराचंद नेमचंद वाचनालयात छत्रपती राजर्षि शाहू महाराजांच्या स्मृति शताब्दी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना वाचनालयाचे कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, शाहू महाराजांनी सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी गाव तिथे शाळा काढल्या, मोफत व सक्तीच्या हुकुम काढला वसतिगृहे काढली. मागासवर्गियांना संस्थानात ५० टक्के आरक्षण दिले. विविध क्षेत्रातील लोकांसाठी भरीव कामगिरी केली. यावेळी वाचनालयाचे कार्यवाह दत्ता गायकवाड, डॉ. नभा काकडे, मोहन अंत्रोळीकर ग्रंथपाल दत्ता मोरे, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रेणुका पतसंस्थेच्या स्वीकृत संचालकपदी पलंगे, काझी

**नातेपुते** : नातेपुते येथील रेणुका महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृत संचालक पदाच्या निवडी रेणुका महिला पतसंस्थेचे स्वीकृत संचालकपदी रोहिणी पलंगे,आयशा काझी यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व चेअरमन सुचित्रादेवी देशमुख यांच्या उपस्थितीत या निवडी जाहीर करण्यात आल्या. नूतन संचालकांनी बँकेचे सभासद वाढवण्याचा प्रयत्न करावा असे मत चेअरमन सुचित्रादेवी देशमुख यांनी व्यक्त केले. यावेळी सोलापूर बाबाराजे देशमुख, व्हॉ.चेअरमन सुवर्णा पांढरे तसेच महिला संचालक व कर्मचारी उपस्थित होते.



## पूजा खंदारे यांचा निवडी बद्दल सत्कार

**उ. सोलापूर** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी युवासेनेच्या युवती पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. सहसचिव पदी पूजा उत्तम प्रकाश खंदारे यांची निवड झाल्याबद्दल उत्तर तालुका शिवसेनेचे उपविभाग प्रमुख अरुण लोंढे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी लक्ष्मण पवार, सुरेश सुतार उपस्थित होते.

### रमाई आवास योजनेच्या अडीच हजार घरकुलांचे काम पूर्ण

# अनु. जाती, नवबौध्द घटकातील कुटुंबाच्या घराचे स्वप्न साकार

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेच्या वतीने शहरात राबवण्यात येत असलेल्या रमाई आवास योजनेच्या अडीच हजार घरकुलाचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे शहरातील अनुसूचित जाती, नवबौध्द घटकातील कुटुंबाचे स्वत:च्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न साकार झाले आहे.**

राज्य सरकारने अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील कुटूंबांसाठी २००९ यावर्षी रमाई आवास योजना सुरू केली आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागात स्वत: च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या जागेवर २६९ चौरस फूटाचे पक्के घर बांधण्यात येते.

या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरात ही योजना प्रभावीपणे राबवली जात आहे.कर्मचाऱ्यांनी शहरातील प्रत्येक भागामध्ये जाऊन सर्व्हे करून खऱ्या लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केला. नागरिकांनमधून ही त्यांच्या१ कामाचे समाधान व्यक्त करण्यात येत आहे



या रमाई आवास योजनेसाठी शासनाकडू एकूण ८१ कोटी १४ लाख ७ ५ हजार रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. यापैकी ६६ कोटी ६६ लाख ६ हजार ९४५ इतका निधी खर्ची पडला आहे उर्वरित घरकुलांचे कामेही प्रगतीपथावर असून महापालिका प्रशासनाच्या वतीने याचा पाठपुरावा करून संबधित विभाग लाभार्थ्यांना स्वताच्या हक्काचे घर मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे. रमाई आवास योजनेमुळे सोलापूर शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील कुटूंबाचे स्वत:च्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न साकार झाले आहे. याबाबत शहरातील लाभार्थ्यांनी पालिका प्रशासनाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

### ३८५ घरकुलांचे काम तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित

शहरात रमाई आवास योजनेसाठी ३३५४ प्राप्त लाभार्थी आहेत त्यापैकी सुमारे अडीच हजार लाभार्थ्यांचे घरकुल बांधून पूर्ण झाले आहे तर ३४५ घरकुलांचे कांम प्रगतीपथावर आहे उर्वरीत ३८५ घरकुलांचे काम तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित आहे.

### चालू वर्षात ४.३० कोटी निधी प्राप्त

सन २०११ पासून ११ वर्षात आत्तापर्यंत एकूण ८१ कोटी १४ लाख ७५ हजार रुपये या योजनेकरिता अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी ३ कोटी रुपये तर दिनांक १९ मे २०२२ रोजी १ कोटी तीस लाख २७ हजार पाचशे रुपये असे एकूण या चालू वर्षात ४ कोटी ३० लाख २७ हजार ५०० रुपये अनुदान महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाले आहे. दरम्यान, १० कोटी ४२ लाख ९४ हजार ३०५ रुपये अनुदान शिल्लक आहे.

## शिवदारे महाविद्यालयात सोमवारी वार्षिक पारितोषिक वितरण

सुराज्य/सोलापूर

येथील जुळे सोलापुरातील दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचालित व्ही.जी.शिवदारे महाविद्यालयाचा पंधरावा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते सोमवार ८ मे रोजी सायंकाळी ४-०० वाजता संपन्न होणार आहे.

या समारंभात विविध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा सन्मान करण्यात येणार आहे. अशी माहिती दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी दिली. या कार्यक्रमाला सर्व बक्षीस पात्र विद्यार्थी, पालक,आणि नागरिकांनी उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थेचे विश्वस्त प्रा.भीमाशंकर शेटे आणि व्ही. जी. शिवदारे कला, वाणिज्य,आणि शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस.सुत्रावे यांनी कळवले आहे .

## जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर तरुणाला मारहाण

सुराज्य/सोलापूर

आईला व पत्नीला शिवीगाळ करणार्याला विचारणा करण्यासाठी गेलेल्या तरुणाला नाकावर मारून जखमी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत बालराज काशिनाथ वाडनाल (वय-३९,रा. जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून श्रीनिवास पुजारी (रा. जुना विडी घरकुल) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास साळुंखे करत आहेत.आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत त्याच्या उजव्या छातीवर जोरात चावा घेतल्याचेही फिर्यादित नोंद आहे.

**चोरट्याने घर फोडून दागिनेसह रक्कम पळवली**

देवकार्यासाठी तुळजापूरला गेलेल्या गोविंद श्रीहरी दुर्गम (वय-४१,रा.वैष्णवी मारूती मंदीर, जुना विडी घरकुल) यांच्या घराचा दरवाजा तोडून हॉलमधील ११ हजारांचे दागिने व रोख रक्कम चोरले.याबाबत दुर्गम यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस नाईक गायकवाड करत आहेत.ही घटना २९ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान घडली.

**रहदारीस अडथळा ; चौघांवर गुन्हा**

रहदारीस अडथळा करत व्यवसाय करणार्या चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यात मधला मारूती परिसरात फुले विकणाऱ्या अरबाज अशपाक कंलादगी (वय-२४, रा. मौलाली चौक),हातगाडीवर चुना विक्री करणार्या नवनाथ दत्तोबा निंबाळकर (वय-५४, रा.उत्तर कसबा), हातगाडीवर प्लॅस्टीकचे सामान विकणार्या महिबूब हुसेन मुल्ला (वय-४३, रा. नवीन विडी घरकुल) व अब्दुल अजीज खाजाभाई शेख (वय-७०,रा. सिध्देश्वर पेठ) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनांचा तपास पोलिस करत आहेत.

**अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह**

शास्त्री नगर परिसरातील राधाकृष्ण चौकातील दोन नंबर बसस्टॉप समोर एक अंदाजे ४० वर्षाचा इसम बेशुध्दावस्थेत आढळून आला.त्याला पोलिस नाईक माडे यांनी उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले असता,डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकित झाली आहे.

**तोळणूर बॉर्डरवरील घटना**

## कारमधील ८८ लाख पोलिसांकडून जप्त

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर बॉर्डरवरून कर्नाटकात जात असलेले स्विफ्ट कार पकडून पोलिसांनी तब्बल ८८ लाख रुपये रोख रक्कम पकडण्यात आले आहे. ही घटना दि.४ मे रोजी सायंकाळी आहे.

४ मे रोजी रात्रीच्या वेळी अंधाराचे गैरफायदा घेत एकजण स्विफ्ट कारच्या (एम एच १३ डी जे ७५४५) डिक्कीमध्ये ठेवून एका लोखंडी पेटीत रोख रक्कम ८८ लाख रुपये घेऊन जात होते. तेव्हा पोलिसांनी कारला पकडले. तेव्हा संबधितांकडून कागदोपत्राची मागणी केली. रक्कम कुठून कुठे घेऊन जात आहात असे विविध प्रश्न सोबत असलेल्या सुरक्षा रक्षकांना विचारले असता एकाही प्रश्नाचे उत्तर व्यवस्थित दिले नाही. म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिह गौर, पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी घटनास्थळी भेट दिली.ही कारवाई पोसई सिद्राम धायगुडे, पोहेकॉ पांढरे, पोहेकॉ बंडगर, पोहेकॉ घोडके, पो.हे.कॉ. अजय भोसले आदींनी कारवाई केली आहे. अक्कलकोट तालुक्यात एकूण चार चेक पोस्ट आहे. वागदरी, सिन्नूर, हिळळी, तोळणूर या चारही ठिकाणी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल आहे. २४ तास तपासणी करण्यात येत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिह गौर, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, जितेंद्र कोळी करडी नजर ठेवून आहेत.

## अपघातात जखमी झालेल्या प्रवाशाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

एसटी स्टॅन्ड ते मोहोळकडे रिक्षातून जात असताना पुणे रोडवरील शोरूम समोर मालवाहतूक वाहनाने धडक दिल्याने रिक्षातील प्रवासी जखमी झालेल्या प्रवाशाचा मृत्यू झाला.अजिनाथ कालिदास गोडसे (वय-५३, रा.रेवती,मोहोळ) असे त्या प्रवाशाचे नाव आहे.

३ एप्रिल रोजी दुपारी गोडसे हे रिक्षातून जाताना पिकपच्या धडकेत रिक्षा पलटी झाली होती.यात गोडसे यांच्या हाताला पायाला खरचटून ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार करून छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान,त्यांचा शनिवारी मृत्यू झाला.या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकित झाली आहे.

## मंगळवेढ्यात ७ मे पासून संत चोखामेळा स्मृतीदिन सोहळ्याचे आयोजन

### विविध धार्मिक कार्यक्रम होणार

सुराज्य/मंगळवेढा

संत चोखामेळा यांच्या ६८५ व्या स्मृतीदिन सोहळयानिमित्त ७-१० मे दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष जयराज शेंबडे यांनी दिली रविवारी दि. ७ मे रोजी दामाजी पंतापासून ते संत चोखामेळा समाधीपर्यंत ग्रंथ दिंडी प्रदक्षिणा सोहळयाने या पुण्यतिथी सोहळयास प्रारंभ होत आहे.

स. १० वा.नामदेवरायाचे सोळावे वंशज ह.भ.प.माधव महाराज रामदास यांच्या हस्ते विणा पूजन होणार आहे.स.११ ते ५ यादरम्यान भव्य राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे आयोजन केले आहे यासाठी १५ हजार,१० हजार,५ हजार व स्मृतीचिन्हे अशी बक्षीसे ठेवण्यात आली,स्पर्धेचे उदघाटन भगीरथ भालके यांच्या हस्ते सिध्देश्वर आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ८ मे रोजी ९ ते ५ या वेळेत भव्य भजन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. संध्याकाळी ७ वा.जेजुरी येथील ह.ब.प.मनोज मोरे महाराज यांच्या किर्तनाचे उदघाटन



भैरवनाथ शुगरचे अध्यक्ष अनिल सावंत यांच्या हस्ते अजित जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सायं. ५ वा. भजन स्पर्धेतील पारितोषिक वितरण विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या हस्ते ॲड. सुजित कदम यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

दि १० मे रोजी सकाळी ९ वा. संत चोखामेळा यांच्या समाधीस आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते समाधीस महाअभिषेक घातला जाणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर,प्रांताधिकारी आप्पासाहेब समिंदर,उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील,तहसीलदार मदन जाधव,मुख्याधिकारी निशीकांत प्रचंडराव,गटविकास अधिकारी आनंद लोकरे,पोलीस निरीक्षक रणजित माने हे उपस्थित राहणार आहेत. दुपारी १२ वाजता निवृत्ती महाराज रामदास यांचे कीर्तन व समाधीस पुष्पवृष्टी होऊन या सोहळयाची सांगता होणार आहे.या सोहळयासाठी संत चोखामेळा समाधी ट्रस्ट आणि वारी परिवार हे परिश्रम घेत आहेत.

## योग आणि मार्शल आर्टच्या माध्यमातून सर्वांगीण विकास शक्य : जाधव

सुराज्य/सोलापूर

सोलापूर योगसाधनेच्या निरंतर अभ्यासामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते. मार्शल आर्टला योगाची जोड दिली की लहान बालकांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते, असे प्रतिपादन रुद्र ॲकॅडमी ऑफ मार्शल आर्ट व योग संस्थेच्या संचालिका संगीता जाधव यांनी केले.

२१ जून रोजी होणाऱ्या ९ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला ४७ दिवस बाकी असल्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि रुद्र ॲकॅडमी ऑफ मार्शल आर्ट व योग संस्था यांचे सयुंक्त विद्यमाने दिनांक ५ मे २०२३ रोजी शिवस्मारक सभागृह, नवी पेठ, सोलापूर येथे आयोजित एक दिवसीय योग व मार्शल आर्ट अभ्यासाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भारत सरकारचे क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी अंकुश चव्हाण, वरिष्ठ योगाचार्य मनमोहन भुतडा, सहायक क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी चव्हाण, भुतडा यांनीही मार्गदर्शन केले.



## मारुती वारे यांचे निधन



**द. सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील माळकवठे येथील रहिवासी असलेले मारुती नामदेव वारे वय (८०) हे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुले सुना व नातवंड असा परिवार आहे

## फातिमा शेख यांचे निधन



**अकलूज** : संग्रामनगर( अकलूज) येथील रहिवाशी शिक्षक सादिक इस्माईल शेख यांच्या मातोश्री फातेमा इस्माईल शेख (वय ८५) यांचे निधन झाले., त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी सून नातवंडे असा परिवार आहे. अकलूज येथील दफनभूमीत त्यांच्यावर दफन विधी करण्यात आला.

## डॉ. स्वयंप्रभादेवी यांनी अध्यात्माची परंपरा जोपासली

### स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे प्रतिपादन

सुराज्य/अकलूज

डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांनी मानवतावादी सेवाभाव जपत अध्यात्माची परंपरा जपली आणि त्या माध्यमातून समस्त मानवजातीसमोर एक आदर्श उभा केला आहे असे प्रतिपादन श्री राम जन्मभूमी तिर्थक्षेत्र आयोध्याचे कोषाध्यक्ष व न्यासी श्री कृष्ण जन्मभूमी न्यास, मथुरा चे उपाध्यक्ष स्वामी श्री. गोविंददेव गिरी महाराज यांनी केले.

शिवशंकर बझारच्या चेअरमन आणि ज्येष्ठ समाजसेविका डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांना जागतिक पातळीवरील शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी नामांकन जाहिर झाल्याबद्दल येथील स्मृती भवन येथे त्यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळयाचे आयोजन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील नागरी सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



अध्यक्षस्थानी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील हे होते. यावेळी नंदिनीदेवी मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, आ.राम सातपुते, धैर्यशील मोहिते-पाटील, डॉक्टर विनायक पावसकर, सयाजीराजे भोसले, संग्रामसिंह मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, विश्व शांतीदूत डॉ.सुधीर तारे, देहू संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब देहूकर, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ महिला भारूडकार चंदाताई तिवाडी, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे चंद्रकांत सहासने, आपुलकी सांस्कृतिक संस्थेच्या अध्यक्षा संजीवनी शिंदे, ज्येष्ठ कवयित्री व काव्यशिल्पच्या अध्यक्षा मंदाताई नाईक, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड फेम पारंपारिक धनगरी ढोल वादक बाळासाहेब मंगसुळे, चि. विश्वतेजसिंह रणजितसिंह मोहिते पाटील, चि. सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सच्चिदानंद नारायणकर यांच्या भरतनाट्यम नृत्याच्या कार्यक्रमाने स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांनी गायलेले गीत सादर करण्यात आले.


सत्काराला उत्तर देताना डॉ. स्वयंप्रभादेवी यांनी मानवतावादी धोरणाची व्याख्या सांगितली. या विश्वात चालणाऱ्या अनेक घडामोडींचा त्यांनी उहापोह करीत प्रत्येकाला जबाबदारीची जाणीव करून दिली. यावेळी प्रस्ताविकाविनोद क्षीरसागर यांनी केले. नोबेल नामांकन निवड समितीमध्ये डॉ.स्वयंप्रभादेवी यांची सदस्यपदी नियुक्ती झाल्याचेही यावेळी विश्वशांती दूत डॉक्टर सुधीर तारे यांनी घोषित केले. शिवशंकर बझारचे व्यवस्थापक गोपाळराव माने देशमुख यांनी शेवटी आभार मानले आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

### चारित्र्यावर संशय घेत दिला मानसिक त्रास

सुराज्य/सोलापूर

पतीने व त्यांच्या कुटुंबियांनी चारित्र्यावर संशय घेत मानसिक त्रास देत ज्योती चव्हाण (वय-२७) यांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत ज्योती यांचे वडील दिलीप व्यंकटराव गायकवाड (वय-५९, रा.यशवंत नगर,उमरगा, उस्मानाबाद) यांनी फिर्याद दिली आहे.



गुरूवारी सायंकाळी मुलगा अथर्व (वय साडेतीन वर्षे) आणि मुलगी आर्या (वय २) हे व ज्योती या गळफास घेतल्याच्या स्थितीत आढळले होते. त्यानंतर शुक्रवारी उत्तरीय तपासणी नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.दरम्यान, गायकवाड यांच्या फिर्यादीनूसार ज्योती यांचा पती सुहास कैलास चव्हाण हा व त्याचे कुटुंबीय हे ज्योती यांच्या चारित्र्यावर संशय घेत त्यांना मानसिक त्रास देत होते. यामुळे त्यांनी आत्महत्या केली,अशी फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून पती सुहास चव्हाण,दीर सुशांत कैलास चव्हाण,सासू मंगल कैलास चव्हाण,नणंद सोनू लक्ष्मण जाधव, जाऊ रेखा सुशांत चव्हाण (सर्व रा.कोंडी,उत्तर सोलापूर) यांच्यावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास स.पो.नि देशमुख करत आहेत.

# अकोले नृसिंह केसरीचा मानकरी ठरला पै. अक्षय मंगरुढे

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



दक्षिण सोलापूर तालुक्यातील अकोले मंद्रुप येथील नृसिंह जंयत्तीनिमित्त सरपंच रमेश आसबे यांनी तालुक्यात सर्वात मोठी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. पै. अक्षय मंगरुढे अकोले नृसिंह केसरीचा मानकरी ठरला.

या कुस्ती स्पर्धेच्या कार्यक्रमाला माजी आ. दिलीप माने, राष्ट्रवादी जिल्हाअध्यक्ष बळीराम काका साठे, सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, अमर पाटील राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व अजिंक्यराणा पाटील, नगरसेवक नागेश गायकवाड, संयोजक बजरंग आप्पा मेकाले, किसन मेकाले, चंद्रकांत वानकर, लतीफ तांबोळी, आशीफ शेख, रॉकी बंगाळे, बाळासाहेब वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कुस्ती आखाड्याचे उद्घाटन माजी आ. दिलीप माने राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष काका साठे यांच्या हस्ते झाला.

शेवटच्या अकोले नृसिंह केसरीसाठी अंतिम दीड लाख रुपयांची कुस्तीत पै. अक्षय मंगवढे यांनी पैलवान सुबोध पाटील याला घुटना डावावर चितपट करून अकोले नृसिंह केसरीचा मानकरी ठरला. पै. अक्षय मंगरुढे दीड लाख रोख रक्कम बक्षीस देण्यात आले. सालाबादप्रमाणे यंदाही नृसिंह जयंती निमित्त अकोले (मंद्रुप)चे सरपंच रमेश आसबे यांनी भरविण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत कुस्ती मल्ला पेक्षा विविध पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची हजेरीची चर्चा कुस्ती फडात राजकीय फड असल्याची चर्चा होताना दिसत होती.

यावेळी राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष सुभाष पाटील, उद्योगपती मळसिद्ध मुगळे, रमेश नवले, माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, बब्रुवान शिंदे, सरपंच प्रभाकर पाटील, मौला शेख, गौरीशंकर मेंडगुदले, विश्वनाथ हिरेमठ, नरेंद्र कदम, बाळासाहेब माने, अमृत पाटील, परमेश्वर सुरवसे, धोंडोपंत पाटील, बिरु पाटील, गजनाथ शेजाळ, लक्ष्मीकांत पाटील, हणमंत पवार, उपसरपंच अंकुश माने, सतीश क्षिरसागर, अमोल कांबळे, नारायण कांबळे, किसन कांबळे, दिपक कांबळे, तुळशीराम कांबळे, परशुराम कांबळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आज विठ्ठल कारखान्यावर शरद पवारांचा कार्यक्रम

## अभिजीत पाटलांचा राष्ट्रवादीत प्रवेश होणार का?

✔ सुराज्य/पंढरपूर




श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर रविवारी माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते बायो सीएनजी प्रकल्पाचे भूमिपूजन आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्यासाठी कारखानास्थळावर मोठी तयारी करण्यात आली आहे. जवळपास दहा ते पंधरा हजार कार्यकर्ते या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पंढरपुरातील चौका चौकात लागलेल्या बॅनरवरून अभिजीत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

स्व. आ. भारत नाना भालके यांच्या निधनानंतर पंढरपूर तालुक्यात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती. विठ्ठल साखर कारखान्यावर एक हाती सत्ता स्थापन केल्यानंतर अभिजीत पाटील गट हा पंढरपुरात नव्याने उदयाला आला, तेव्हापासून पंढरपूर तालुक्याचे राजकारण अभिजीत पाटील यांच्या नावाभोवती सातत्याने फिरत राहिले आहे.

अभिजीत पाटील जेवढे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळ आहेत, तेवढेच ते भाजपच्या देखील जवळ आहेत. भाजप सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना त्यांना मोठी मदत केली आहे. अभिजीत पाटील यांचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघावर लक्ष आहे. येणाऱ्या विधानसभेसाठी त्यांनी तयारी सुरू केली आहे.

सध्या पंढरपूर मंगळवेढा विधानसभा भाजपच्या ताब्यात आहे. त्यामुळे अभिजीत पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधानसभेचे तिकिट मिळण्याची शक्यता आहे. तसेच श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणावर माढा विधानसभा मतदारसंघात आहे. मात्र, माढा विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात आहे. त्यामुळे माढा विधानसभा लढवण्यासाठी त्यांना राष्ट्रवादीतून नाहीतर भाजपमधून स्कोप आहे.



## वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य आदर्शवत : अनिल सिंग

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : राज्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या धरतीवर स्वामी समर्थांचे मूळस्थान असलेल्या अक्कलकोट नगरीतील मूळस्थान वटवृक्ष मंदिर समितीचे उपक्रम भाविकांच्या सोयीचे आहेत. गर्दीमध्ये सर्वोत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी मंदिर समितीचे नेहमीच सचोटीचे प्रयत्न असतात. त्यात नेहमी उत्कृष्ट सेवा देऊन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर समिती भाविकांना नेहमीच सर्वोत्तम सोई सुविधा पुरवीत आहे. त्यामुळे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य आदर्शवत असल्याचे मनोगत भारतीय न्याय व्यवस्थेच्या मुंबई उच्च न्यायालयाचे अप्पर महा सॉलिसिटर जनरल अनिल सिंग यांनी व्यक्त केले. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन सिंग यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी सॉलिसिटर जनरल अनिल सिंग यांचा सन्मान केला. यावेळी जनरल अनिल सिंग बोलत होते. यावेळी प्रमुख सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, ॲड. मिलिंद थोबडे, पोलीस निरीक्षक महेश स्वामी, पो. कॉ. गजानन चव्हाण, आत्माराम घाटगे, महेश गोगी, विपुल जाधव, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, चंद्रकांत सोनटक्के उपस्थित होते.

# वेळापूर-महाळुंग रोडवर स्पीड ब्रेकर बनवण्याची मागणी

✔ सुराज्य/वेळापूर

**वेळापूर महाळुंग रोडवर असणाऱ्या कोरबू वस्ती, मदने वस्ती, आणि वाघे वस्ती येथून जाणाऱ्या रोड वरती स्पीड बेकर बनवावा, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.**



इतिहासकालीन असणारा जुना वेळापूर महाळुंग रोडची वर्षानुवर्षे या रोडची देखभाल न झाल्याने दुरावस्था झाली होती. माळेवाडी बोरगाव हद्दीवरील ओढ्यावरील पुल व महाळुंग गेंडवस्ती येथील पुल खराब झाला होता. पिसाळवस्ती श्रीपूर ते वेळापूर ८ ते ९ किलोमिटरचा रोड पूर्णत: खराब झाला होता. या रोडचे पंतप्रधान निधींतून नुकतेच काम पूर्ण झाले असून रोडचा अनेक वर्षाचा प्रश्न सुटला आहे. पण रोड डांबरीकरण झाल्यानंतर या रोडवरुन टेंभुर्णी, महाळुंग, वाघोली, वाफेगाव, लवंग, श्रीपूर, मिरे, करोळे या परिसरातून कोल्हापूरला, सांगली, सातारा येथे जाण्याचा जवळचा मार्ग असल्याने रोडवरुन वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

चारचाकी वाहनांचा वेग वाढल्यामुळे रोड लगत असणाऱ्या कोरबू वस्ती, मदने वस्ती व वाघेवस्तीवरील मुलांना आपघाताचा धोका निंमाण झाला असून संबधित विभागाने या ३ वस्त्याजवळ स्पीड ब्रेकर बनवावेत म्हणजे लहान मुलांचा आपघाताचा धोका कमी होण्यास मदत होईल, तरी वरील तीन वस्तींवर स्पीड बेकर बनवावेत, अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

## मंगळवेढा तहसीलसमोर वंचित बहुजन आघाडीचे उपोषण

✔ सुराज्य/मंगळवेढा

तालुक्यातील जालीहाळ येथे ग्रामपंचायतची परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या सौर प्रकल्पावर कारवाई करण्यात तहसील कार्यालयाने टाळाटाळ केल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

सोलापूर येथील एका खाजगी कंपनीने जालीहळ येथील जमिनीच्या दोन गटातील २५ हेक्टरवर सौर प्रकल्प उभा केला. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी जमिनीचा आकृषक करण्यासाठी ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला घेणे आवश्यक होते. कंपनीने सादर केलेल्या दाखल्यावरील ग्रामसेवकांच्या दाखल्यावरील सही बनावट असून सदर ग्रामसेवकाने आपण 'ना हरकत दाखला' दिला नसल्याचे लेखी पत्र तक्रारदाराला दिले होते. त्यामुळे या ना हरकत दाखल्यावरील सही कुणाची? हा प्रश्न अनुत्तरीत असताना बेकायदेशीर सुरू करण्यात आलेल्या या सौर प्रकल्पावर कारवाई करावी या मागणीसाठी येथील स्थानिक नागरिकांनी तहसील कार्यालयाकडे तक्रार दिली होती. परंतु तहसील कार्यालयाने यावर कारवाई केली नाही. त्यामुळे निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

# कर्नाटक सीमेवर मंद्रुप पोलिसांकडून तपासणी

## भंडारकवठे, सादेपूर, टाकळी येथे पोलीस कर्मचारी तैनात

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्नाटकात जाणाऱ्या टाकळी, सादेपूर व भंडारकवठे मार्गावर मंद्रुप पोलिसांनी वाहनांची कसून तपासणी सुरू केली आहे. याठिकाणी तीन अधिकाऱ्यांसह १८ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी दिली.**



कर्नाटक विधानसभेसाठी १० मे रोजी मतदान होत. तर १३ मे रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. यादरम्यान कुठल्याही प्रकारची तस्करी, अवैध घटना किंवा अनुचित प्रकार घडणार नाही. याची दक्षता मंद्रुप पोलिसांकडून घेतली जात आहे. सहायक पोलीस निरीक्षक मांजरे यांनी त्यासाठी खास पथक नेमले आहे. सोलापूर विजयपूर महामार्गावरील नांदणी येथील टोल नाका तसेच टाकळी येथे बंदोबस्त लावण्यात आला आहे. याशिवाय भीमा नदीवरील सादेपूर बंधारा व भंडारकवठे येथील बंधाऱ्यावर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

विजयपूर जिल्ह्यातील इंडी आणि नागठाण या मतदारसंघात जाणा-या या रस्त्यावर सशस्त्र बंदोबस्त ठेवला आहे.

कर्नाटक सीमावरती भागातील या तीन ही ठिकाणी वाहनांची कसून तपासणी करूनच पुढे सोडले जात आहे. ही तपासणी चोवीस तास चालणार आहे. अशी माहिती सपोनी मांजरे दिली. बंदोबस्तासाठी ग्रेड पीएसआय पोलीस उपनिरीक्षक अशोक ढवळे, सूर्यकांत बिराजदार यांच्यासह पोलीस कर्मचारी आहेत.



## पंचशीलनगर येथे बुद्ध जयंती साजरी

✔ **सुराज्य/वेळापूर** : येथील पंचशील नगर येथील तथागत बुद्ध विहार या ठिकाणी बुद्ध जयंतीनिमित्त थायलंडवरून आणलेल्या बुद्ध रूपाचे पूजन उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. बौद्ध समाजाच्यावतीने जानकर यांचा बाजार समितीच्या नूतन संचालकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच रजनीश बनसोडे, पोलीस स्टेशनचे निकम, मोरे, जयंती उत्सव अध्यक्ष विजय बनसोडे, अजय बनसोडे, विशाल गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य रविराज गायकवाड, बाळासाहेब धांडोरे, बाबासाहेब माने, हनुमंत वायदंडे, सर्जेराव जाधव, रमेश बनसोडे, दादा कांबळे, रणजीत बनसोडे, गणेश धांडोरे, चंद्रकांत गाडे, प्रशांत बनसोडे, किरण बनसोडे, रंजीत सरवदे, विकास बनसोडे, सुयोग बनसोडे, सचिन उबाळे, गणेश कांबळे आदी उपस्थित होते.

## कमल जगताप यांचे निधन

✔ **सुराज्य/माळशिरस** : शेंडेचिंच (ता. माळशिरस) येथील रहिवासी श्रीमती कमल विश्वनाथ जगताप यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या डॉ. सुनील जगताप यांच्या मातोश्री तर वेळापूर येथील औषधी विक्रेते अनिल राजेंद्र जगताप यांच्या त्या आजी होत.

# पायाभूत बाबींचा अभ्यास असेल तर उत्तम कामगिरी होते: डॉ. राजगुरू

## स्वेरीत राज्यस्तरीय 'फिएस्टा २ के २३' स्पर्धा

✔ सुराज्य/पंढरपूर




पायाभूत संकल्पनांच्या अभ्यासामुळे त्या ठराविक क्षेत्रात आत्मविश्वास वाढतो आणि तेवढ्याच उत्साहाने स्पर्धेत उतरता येते आणि यश देखील तेवढ्याच ताकदीने मिळते', असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्था, माढा येथील प्रा. डॉ. संतोष राजगुरू यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या 'इंग्लिश बुक रिडिंग, ड्रामा अँड लिटररी स्टुडंट क्लब' आणि 'ॲश्रे स्वेरी स्टुडंटस ब्रँच' यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी राज्यस्तरीय स्पर्धा 'फिएस्टा २ के२३' संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रा. डॉ. संतोष राजगुरू हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यक्रमाचे मुख्य कन्वेनर व शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रशांत पवार यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमात स्टुडंट क्लबचे प्रेसिडेंट शंभूराजे देशमुख यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्ष प्रा. दिग्विजय रोंगे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

## नळातून आले चक्क छोटे जिवंत मासे

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

शहरातील टेंभुर्णी रस्त्यालगत असलेल्या गोल चाळीत काही नागरिकांच्या नळाच्या पाण्यात चक्क जिवंत छोटे मासे आल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांत अनेक भागांत दुर्गंधीयुक्त, पिवळे, दूषित पाणी येते. नागरिकांनी यावर अनेक वेळा तक्रारी केल्या. तरी यावर प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नाही. नुकतेच शहरातील गोल चाळ, नेहरूनगर, बसस्थानकाकडे जाणारा रस्ता या भागात नळाद्वारे सोडण्यात आलेल्या पाण्यात गोल चाळीतील काही घरांत चक्क छोटे जिवंत मासे आढळून आले.



## गुलाब शिंदे यांचा प्रामाणिकपणा

### गहाळ झालेले १ लाख २५ रूपये दिले परत

✔ **सुराज्य/सांगोला** : सांगोला शहरातील वासूद रोड, जिव्हाळा कॉलनी येथील गुलाब शिंदे यांनी दोन तरुण युवकांकडून गहाळ झालेले १ लाख २५ हजार रुपये त्यांच्या स्वाधीन करत प्रामाणिकपणाचा आणखी एक नवा आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

जुनोनी येथील गॅस एजन्सीमध्ये काम करणाऱ्या दोन तरुण युवक कर्मचाऱ्यांची १ लाख २५ हजार रुपये रोख रकमेची पिशवी वासूद रोड पाण्याच्या टाकिजवळ अनावधनाने पडली होती. याचवेळी रस्त्यावर रात्री ११ च्या सुमारास फिरुन झाल्यावर घराकडे परत जात असताना गुलाब शिंदे यांना ती पिशवी आढळून आली. पिशवीत पाहिल्यानंतर रक्कम आढळून आली. त्यानंतर पाण्याच्या टाकिजवळ दोन युवक अस्वस्थ चेहऱ्याने रस्त्याने वारंवार फिरत असताना त्यांच्या निदर्शनास आले. त्या दोन युवकांवर शिंदे यांनी विचारले असता त्यांनी १ लाख २५ हजार हरविल्याचे सांगितले. शिंदे यांनी लागलीच त्यांना १ लाख २५ हजार रुपयांची पिशवी लगेचच त्यांच्या स्वाधीन केली. ले जात आहे.

# गौतम बुद्ध यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

✔ सुराज्य/अकलूज

**जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणीक तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६७ वी जयंती अकलूज येथे विविध उपक्रमाने साजरी झाली. येथील सारनाथ बुद्ध विहारात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते बुद्ध पूजा तर धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते पंचशील ध्वज फडकवण्यात आला. सायंकाळी अकलूज शहरातून तथागत बुध्दाच्या प्रतिमेची मिरवणूकही काढण्यात आली होती.**



वैशाखी पौर्णिमा बुद्ध जयंतीनिमित्ताने अकलूज येथील सारनाथ बुद्ध विहार येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते सारनाथ बुद्ध विहारात अभिवादन करण्यात आले. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते धम्मध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी सरपंच विठ्ठल गायकवाड, नाशिक सोनवणे, प्रवीण लोंढे, बाळासाहेब गायकवाड, किरण धाईंजे, रिपाइं जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, वैभव गिते, भिमराव चंदनशिवे, विशाल मोरे, सचिन लोंढे आदी उपस्थित होते. यावेळी पठण, धम्मदेसना, धम्मध्वजारोहण, बुद्ध पूजा व खीरदान असे कार्यक्रम पार पडले. अकलूज व परिसरातील बौद्ध उपासकांनी सारनाथ बुद्ध विहारात तथागताना अभिवादन केले.

बुद्ध जयंतीनिमित्ताने बुधवार दि. ३ मे ते शुक्रवार दि. ५ मे २०२३ दरम्यान आयोजित केलेल्या बुद्ध महोत्सवात भिमा तुझ्या जन्मामुळे महानायकाच्या महागाथेच महानाट्याचे सादरीकरण झाले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बार्टी) चे विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांचे महारांचा लष्करी व सांस्कृतिक इतिहास व समग्र भिमा कोरेगाव संग्राम या विषयावर प्रबोधन पर व्याख्यान पार पडले. 'बुद्ध पहाट' या संगीतमय कार्यक्रमात गायक विजय सरतापे यांच्या बुद्ध व भिमगिताने श्रोते मंत्रमुग्ध केले. सायंकाळी अकलूज शहाराच्या मुख्य मार्गावरुन तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली.

# ढवळस रेल्वे स्टेशनची पोलीस अधीक्षकांकडून पाहणी

## रेल्वे हद्दीत गुन्हे घडू नये म्हणून केले मार्गदर्शन

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

**ढवळस (ता. माढा) येथील रेल्वे स्टेशनवरील होम सिग्नल कट केल्यामुळे एकतानगर-चेन्नई एक्सप्रेस थांबल्याने अज्ञात चोरट्याने खिडकी चढून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मणी माळ ओढून जबरी प्रयत्न फसला होता. या प्रकरणी लोहमार्ग पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्टेशनची पाहणी केली. यावेळी त्यांनी रेल्वे हद्दीत सिग्नल कटिंग व चोरीसारखे गुन्हे घडू नयेत, त्याचप्रमाणे पारधी समाजातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे व मूळ प्रवाहात यावेत, यासाठी विविध भागास भेट देऊन गुन्हे रोखण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेतला.**

कुर्डूवाडी, दौंड लोहमार्गवर सतत लूटमार चोरी होत असते. सिग्नल यावेळी दौंड, कुर्डूवाडी रेल्वे कटिंग करून प्रवाशांना लुटले जाते. या हद्दीत आरपीएफ यांच्यासह या सर्व बाबींना आळा घालण्याचा चोख बंदोबस्त व पेट्रोलिंगचे नियोजन केले. त्याचबरोबर मुख्यालयामधील त्यांची उपजीविका व शिक्षणाचे महत्व अतिरिक्त लोहमार्ग पोलीस कुर्डूवाडी, पटवून देण्यासाठी मेळावा घेण्याचा निर्धार केल्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सांगितले. धिवरे यांनी दौंड कुर्डूवाडी लोहमार्ग त्याचप्रमाणे प्रवाशांनी स्टेशन शिवाय हद्दीतील विविध भागातील गाडी अन्य ठिकाणी स्लो झाल्यास समाजातील नागरिकांना भेटून पाहणी अथवा थांबल्यास खिडक्या दरवाजे बंद ठेवण्याचे आवाहन केले.

यावेळी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, पोलीस निरीक्षक संगिता हत्ती, दौंड लोहमार्ग सहायक पोलीस निरीक्षक कलगुटगे, पारधी समाज प्रतिनिधी नामदेव भोसले यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते. भविष्यात पारधी समाजाचे समुपदेशन करण्यासाठी मेळावा घेण्याचा मानस पोलीस अधीक्षक धिवरे यांनी व्यक्त केले.

# हुकूमशाहीने प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र पेटवू

## रत्नागिरीतल्या राजापूर येथील बारसूमधल्या प्रस्तावित रिफायनरीवरून मोठा वाद सुरू आहे

### राजापूरमध्ये उद्धव ठाकरेंचा शिंदे सरकारवर घणाघात!

सुराज्य/मुंबई

**बारसूतील प्रस्तावित रिफायनरीवरून मोठा वाद सुरू आहे. या प्रकल्पाला स्थानिकांनी कडाडून विरोध केला आहे. याविरोधात स्थानिक ग्रामस्थ आंदोलनही करत आहेत. तर पोलिसांकडून या आंदोलकांविरोधात बळाचा वापर झाल्याचं निदर्शनास आलं आहे. दरम्यान, शनिवारी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजापूरमध्ये जात येथील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडलं.**

**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

लोकांची डोकी फुटली तरी चालतील, कोकणातील लोक भिकारी झाले तरी चालतील. मात्र, रिफायनरी झाली पाहिजे, अशी शिंदे सरकारची भूमिका आहे. मात्र, बारसूमधील लोकांना रिफायनरी नको असेल तर इथे रिफायनरी होता कामा नये, जर हुकूमशाहीने हा प्रकल्प लादण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र पेटवू, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी शिंदे सरकारवर केली आहे.

**...तर असा विकास आम्हाला नको**

मी मुख्यमंत्री असताना टाटा एअरबस, बल्कड्रग्ज पार्क असे अनेक प्रकल्प महाराष्ट्रात आणले होते. मात्र, हे सर्व प्रकल्प गुजरातला हलवण्यात आले आणि आता वादग्रस्त प्रकल्प महाराष्ट्राच्या माथी मारण्यात येत आहेत. त्यामुळे राख महाराष्ट्राला आणि रांगोळी गुजरातला असं मी होऊ देणार नाही. आपल्याच जनतेला नुकसान पोहोचवून हे सरकार विकास करणार असेल तर असा विकास आम्हाला नको, असेही म्हणाले.

**मी 'जन की बात' ऐकायला आलोय**

'आज मी कोकणात 'मन की बात' करायला आलेलो नाही, तर 'जन की बात' ऐकायला आलो आहे. शिवसेना ही बारसूतील लोकांच्या पाठिशी आहे. जर येथील लोकांना रिफायनरी नको असेल तर काहीही झालं तरी इथे रिफायनरी होऊ देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.'



**मुख्यमंत्री शिंदेंवरही केली टीका**

दरम्यान, यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांनाही लक्ष्य केलं. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना आज ३३ देशात गद्दार म्हणून ओळखलं जातं. आमच्या सरकारमध्ये मंत्री असताना त्यांना महाराष्ट्रातील तीन जिल्हेसुद्धा ओळखत नव्हते, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

# जातपडताळणी समित्यांना खडे बोल

## पुनर्विलोकन अधिकारच नसल्याचा न्यायालयाचा निर्वाळा

सुराज्य/मुंबई

**'जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने एखाद्याच्या जात प्रमाणपत्रतेची वैधता तपासून त्याला जातवैधता प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याचे पुनर्विलोकन करण्याचा त्या समितीला अधिकारच नाही. त्यामुळे अशा समित्यांना आपण स्वत:च दिलेल्या जातवैधता प्रमाणपत्रांबाबत किंवा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिलेल्या प्रमाणपत्रांबाबत लबाडीची किंवा गैरप्रकारांची तक्रार आली तरी स्वत:हून (सुओ मोटो) पुनर्विलोकन करता येणार नाही. समित्यांनी असे केले तर ते अवैध व कायद्यातील तरतुदींच्या विरोधात असेल', असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. राजेश लड्ढा यांच्या खंडपीठाने नुकताच एका प्रकरणाच्या निमित्ताने दिला आहे.**




कोळी-महादेव या अनुसूचित जमातील अंशुमन उंबर्जे यांचा जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याचा दावा पडताळणी समितीने फेटाळला होता. त्याविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात याचिका केली होती. आपल्या वडिलांना दोन दशकांपूर्वीच उच्च न्यायालयाच्या आदेशाने जातवैधता प्रमाणपत्र देण्यात आले होते, असे निदर्शनास आणत विविध कायदेशीर मुद्दे त्यांनी मांडले होते. त्यानंतर अंशुमन यांना वैधता प्रमाणपत्र देण्याचा आदेश अन्य एका खंडपीठाने ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दिला होता. मात्र, अंशुमन यांनी वडील व नातेवाईकांच्या वंशावळीबाबत दिलेल्या तपशीलात काही तफावती निदर्शनास येतात. समितीला त्याची तपासणी करून कायद्याप्रमाणे योग्य ती पावले उचलता येतील आणि प्रमाणपत्र त्याच्या अधीन असेल', असे निरीक्षणही त्या खंडपीठाने आदेशात नोंदवले होते. त्याचा आधार घेत पुणे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने अंशुमन यांच्या नात्यातील १० जणांच्या पूर्वीच्या वैधता प्रमाणपत्रांचे पुनर्विलोकन स्वत:हूनच सुरू करत सर्वांना १३ मार्च २०२३ रोजी नोटीस धाडली. त्याला या सर्वांनी ॲड. रामचंद्र मेंदाडकर, ॲड. प्रियांका शॉ व ॲड. जयश्री मेंदाडकर यांच्यामार्फत याचिकेद्वारे आव्हान दिले होते.

या सर्व नातेवाईकांना खूप पूर्वीच तत्कालीन समितीने कायद्याप्रमाणे आणि अन्य अनेकांच्या प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचा आधार घेत वैधता प्रमाणपत्रे दिली होती. त्याला कोणी आव्हानही दिले नाही. त्यामुळे त्यांच्या जात वैधतेवर शिक्कामोर्तब झालेले आहे. असे असताना केवळ उच्च न्यायालयाच्या एका निरीक्षणाचा चुकीचा अर्थ घेत आणि ते निरीक्षण केवळ अंशुमनच्या प्रकरणाबाबत असताना समितीने स्वत:हूनच जुन्या प्रकरणांचे पुनर्विलोकन हाती घेतले आहे. हे पूर्णपणे बेकायदा आहे', असा युक्तिवाद मेंदाडकर यांनी मांडला. तर लबाडीने किंवा चुकीची माहिती देऊन वैधता प्रमाणपत्र मिळवल्याचा प्रकार असेल तर संबंधित कायद्याच्या कलम ९ अन्वये समितीला पुनर्विलोकनाचा अधिकार आहे', असा युक्तिवाद समितीतर्फे करण्यात आला. मात्र, खंडपीठाने समितीचा युक्तिवाद फेटाळला आणि समितीची नोटीस रद्दबातल ठरवली.

# १३ अल्पवयीन मुलींचे बालविवाह रोखले

## महिला व बालकल्याण विभागाची कारवाई



सुराज्य/नाशिक

**महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने राबवण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंधात्मक धडक मोहिमेंतर्गत तब्बल १३ बालविवाह रोखण्यात आले आहेत. १ एप्रिल ते २ मे या कालावधीत हे बालविवाह रोखण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये हे बालविवाह होणार होते. यात नाशिक तालुक्याचाही समावेश आहे. महिनाभरात एकट्या त्र्यंबकेश्वर तालुक्यात तब्बल सात बालविवाह होणार होते. मात्र, महिला व बालकल्याण विभागाच्या सावधानतेमुळे संबंधित कुटुंबातील पालकांचे मनसुबे पूर्णत्वास जाऊ शकले नाहीत.**

महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेच्या हल्या टप्प्यात बालविवाह करू नये, बालविवाहाचे दुष्परिणाम, बालविवाह होणार असल्याचे कळाल्यास तक्रार कुठे करावी, याबद्दल जनजागृती करण्यात आली होती. त्याचाच परिणाम म्हणून जिल्हा प्रशासनाकडे बालविवाहांसंदर्भात गोपनीय तक्रारी प्राप्त झाल्याचे या विभागाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. त्यानुसार कार्यवाही करीत महिला व बालकल्याण विभागाने जिल्ह्यात १३ बालविवाह रोखले. यामध्ये नाशिक तालुक्यातील एक, सिन्नर एक, बागलाण दोन, त्र्यंबकेश्वर सात तर इगतपुरीमधील दोन बालविवाह रोखण्यात आले आहेत.

काही दिवसांपूर्वी त्र्यंबकेश्वर तालुक्यात एकाच कुटुंबातील दोन अल्पवयीन बहिणींचा बालविवाह लावण्यात येणार होता. संबंधित कुटुंबात विवाहाची तयारीही झाली होती. मात्र, या मुली अवघ्या १४ आणि १५ वर्षांच्या असल्याची माहिती जिल्हा परिषद यंत्रणेला समजली होती. त्यानुसार संबंधित कुटुंबीयांचे समुपदेशन करून त्यांना या विचारापासून परावृत्त करण्यात आले होते.

# कावेरी मोहीम फत्ते

## सुदानमध्ये अडकलेले सर्व भारतीय मायदेशी परतले

सुराज्य/नवी दिल्ली

सुदानमधील देशांतर्गत युद्धात अडकून पडलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाने २४ एप्रिलपासून 'ऑपरेशन कावेरी' ही मोहीम सुरू केली होती. या मोहिमेद्वारे जल आणि हवाई मार्गाने हजारो भारतीयांना मायदेशात परत आणण्यात भारत सरकार यशस्वी झालं आहे. या मोहीमेअंतर्गत तब्बल ३,८६२ भारतीय सुखरूप मायदेशी परतले आहेत. त्यानंतर आता ही मोहीम बंद करण्यात आली आहे. भारतीय वायूसेनेचं शेवटचं विमान शुक्रवारी ४७ भारतीय नागरिकांना घेऊन मायदेशी परतलं. त्यानंतर ही मोहीम थांबवत असल्याचं सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

सुदानचे लष्करप्रमुख जनरल अब्देल फताह बुरहान आणि रॅपिड सपोर्ट ग्रुप' (आर.एस.एफ.) या निमलष्करी दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद हमदान दगालो या दोन बलवान नेत्यांमध्ये सत्तेसाठी संघर्ष पेटला आहे. युद्धविरामाची शक्यता मावळल्यानंतर विविध देशांनी आपले राजनैतिक अधिकारी आणि नागरिकांना सुदानबाहेर काढण्याची प्रक्रिया हाती घेतली. सुदानमध्ये जवळपास चार हजारांच्या आसपास भारतीय नागरिक होते. दरम्यान, भारत सरकारने ३,८६२ नागरिकांना मायदेशी परत आणलं आहे.

सुदानमध्ये अडकलेल्या भारतीयांना मायदेशात परत आणण्यासाठी भारतीय हवाई दलाच्या विमानांनी १७ उड्डाणं केली. तसेच भारतीय नौदलाने पोर्ट सुदानहून भारतीयांना



सौदी अरबच्या जेद्दा बंदरावर आणलं. तिथून पाच विमानांनी उड्डाण केलं. तसेच परराष्ट्र मंत्रालयाने सुदानच्या सीमेला लागून असलेल्या देशांमधील मार्गांनी ८६ भारतीयांना मायेशी आणलं. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने सुदानमधून भारतीयांना बाहेर काढण्याच्या प्रक्रियेत मदत केल्याबद्दल सौदी अरबचे आभार मानले. तसेच चाड, इजिप्त, फ्रान्स, दक्षिण सुदान, संयुक्त अरब अमिराती, ब्रिटन, अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांचे आभार मानले.

ऑपरेशन कावेरीबद्दल परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले, 'या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्वांचं कौतुक करायला हवं. त्यांच्या धैर्याचं कौतुक व्हायला हवं. खार्तूम (सुदान) येथील आमच्या दूतावासाने या कठीण काळात विलक्षण समर्पण दाखवलं आहे.'

### जयशंकर यांनी पाकिस्तानला सुनावले

पणजी: पाकचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुत्तो झरदारी हे दहशतवाद उद्योगाचे प्रवर्तक, समर्थक आणि प्रवक्ते आहेत, असा आरोप परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी 'शांघाय सहकार्य संघटने'च्या परिषदेतील बैठकीनंतर केला.

## शिर्डीत पोलिसांकडून हायप्रोफाईल सेक्स रॅकेट उघड

### १५ तरुणींची सुटका

**सुराज्य/नगर :** ज्या शिर्डीत जगभरातून भाविक साईबाबांच्या समाधीवर डोके टेकविण्यासाठी येतात, त्याच शिर्डी शहरात हाय प्रोफाईल सेक्स रॅकेट सुरू असल्याचे आढळून आले आहे. पोलिसांनी शुक्रवारी रात्री अचानक अनेक हॉटेलवर छापे टाकले. यामध्ये १५ मुलींची सुटका करण्यात आली असून ११ आरोपींनी अटक करण्यात आली. भाविकांच्या निवासाची सोय म्हणून चालविण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींच्या हॉटेलमध्ये हे प्रकार सुरू होते. पोलिसांच्या कारवाईची माहिती मिळताच, अनेकांनी हॉटेल बंद केली. श्रीरामपूर उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक संदीप मिटके यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

## श्रीगोंद्यात मानवी तस्करी; लोकांना डांबून भीक मागायला लावतात

**सुराज्य/नगर :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीत कार्यरत असलेल्या टोळ्या या मानवी तस्करी करून लोकांना डांबून ठेवून, मारहाण करत वेठबिगारी करून घेत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

या प्रकारामुळे श्रीगोंदा तालुक्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांना ताब्यात घेतलं असून चौघांची सुटका करण्यात आली आहे. या घटनेत मानवी तस्करी करत इतर राज्यातील मानसिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आणून त्यांच्याकडून घरची आणि शेतातील काम करून घेत असल्याचा प्रकार समोर आला आहे. तर काही ठिकाणी रेल्वे स्थानकांवर अशा लोकांकडून भीक मागून घेतली जात असल्याचं पोलीस तपासात उघड झालं आहे.

## सांगलीतील जतमध्ये भीषण अपघात; ५ जणांचा मृत्यू

**सुराज्य/जत :** सांगलीतील जतमध्ये भीषण अपघात झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. शक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास हा अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी स्थानिकांनी व पोलिसांनी धाव घेतली. मिळालेल्या माहितीनुसार, सांगलीतील जतमध्ये असलेल्या विजापूर-गुहाघर मार्गावरील अमृतवाडी फाट्याजवळ हा अपघात झाला. या अपघातात एका कारने रस्त्याच्या कडेला उभा असलेल्या डंपरला धडक दिल्याचे समजते. कारने डंपरला जोराची धडक दिली असल्याने एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

## खलिस्तानवाद्यांकडून सिडनीत मंदिराची विटंबना


**मेलबोर्न :** ऑस्ट्रेलियात सिडनीतील एका प्रसिद्ध हिंदू मंदिराची खलिस्तानी समर्थकांकडून शुक्रवारी कथितरित्या विटंबना करण्यात आली. या मंदिरात भारतविरोधी भित्तिचित्रे लावण्यात आली. या महिना अखेरीस पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर हिंदू मंदिरांच्या मोडतोडीच्या घटनांपैकी ही एक ताजी घटना आहे.

ही घटना सिडनीतील रोझहिल येथील श्री स्वामीनारायण मंदिरात घडली. या मंदिराच्या पदाधिकाऱ्यांना या मंदिराच्या प्रवेशद्वारावर खलिस्तानी ध्वज लावलेला आढळला. या घटनेची माहिती 'न्यू साऊथ वेल्स' पोलिसांना दिली, असे वृत्त 'ऑस्ट्रेलिया टुडे' या वृत्तपत्राने दिले आहे.

## जम्मूमध्ये पुन्हा चकमक, दोन दहशतवादी ठार

**सुराज्य/जम्मूकाश्मीर :** जम्मूतील राजौरीतील जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्याकरता भारतीय लष्कराने मोहिम हाती घेतली असून जम्मूमध्ये रोज चकमकी घडत आहेत. शुक्रवारी झालेल्या चकमकीत भारतीय लष्कराचे ५ जवान शहीद झाले आहेत तर शनिवारी सकाळी जम्मू पोलिसांनी पुन्हा ऑपरेशन सुरू केलं. राजौरी आणि बारामुल्ला जिल्ह्यात चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यास यश मिळालं आहे.

## मिस युनिव्हर्स सिएनाचे २३ व्या वर्षी निधन; घोडेस्वारी करताना पडून झाला अपघात



**मेलबोर्न :** मिस युनिव्हर्स सीएना वीरचं निधन झालं आहे. वयाच्या २३ व्या वर्षी या मॉडेलने अखेरचा श्वास घेतला आहे. ऑस्ट्रेलियामध्ये घोडेस्वारी करताना तिचा अपघात झाला. त्यानंतर तिला रूग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली. मिळालेल्या माहितीनुसार २ एप्रिलला सिडनीच्या विंडसर पोलो ग्राऊंडमध्ये घोडेस्वारी करत होती. त्यावेळी घोड्यावरून पडून सिएनाचा अपघात जाला. त्यानंतर तिला तातडीने वेस्टमीड रूग्णालयात नेण्यात आलं. तिथे तिला लाइफ सपोर्ट सिस्टिमवर ठेवण्यात आलं होतं. गेल्या काही आठवड्यांपासून ती लाइफ सपोर्ट सिस्टीमवर होती. शनिवारी तिची प्राणज्योत मालवली.

# मेलेला आरोपी जिवंत झाला; फरार ठगाला बघून पोलीस चक्रावले

सुराज्य/मुंबई

**फसवणुकीच्या गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला यलोगेट पोलीस अनेक वर्षांपासून शोधात होते. तपासादरम्यान या गुन्ह्यातील इतर अटक आरोपींनी फरार असलेल्या आरोपीचा एचआयव्हीमुळे गावी मृत्यू झाल्याचे कळले. पोलिसांनी कुटुंबीयांकडे मृत्यूचा दाखला मागितला असता ते टाळाटाळ करू लागले. अखेर पोलीस पश्चिम बंगालात पोहोचले आणि मृत्यू झाल्याचे सांगण्यात येणारा फरार आरोपी चक्क जिवंत सापडला.**

---------------

यलोगेट पोलीस ठाण्यात २००७मध्ये फसवणुकीच्या गुन्ह्यात काही आरोपींना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात जामीन मिळाल्यानंतर अटक आरोपींपैकी गणेश ऊर्फ बबलू नीताई पात्रा हा न्यायालयात हजर राहत नव्हता. अनेक




वर्षे गैरहजर राहत असल्याने न्यायालयाने अखेर गणेश याला फरार घोषित केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सरला वसावे, निरीक्षक महेश पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुनील कर्पे आणि विशाल सोनावणे यांनी गणेश याचा कसून शोध सुरू केला.

पोलिसांनी या गुन्ह्यातील सहआरोपींकडे त्याची चौकशी केली. त्यावेळी गणेशचा एचआयव्हीने मृत्यू झाल्याचे सांगितले. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी गणेश याचा मेहुणा रणजीत शाहू याचा मोबाइल क्रमांक मिळवला. रणजीत याच्याकडे गणेश याच्याबाबत विचारले असता त्यानेही त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. पोलिसांनी मृत्यूच्या दाखल्याबाबत विचारले तेव्हा रणजीतने उडवाउडवीची उत्तरे दिले. त्यामुळे पोलिसांना संशय आला. पोलिसांच्या पथकाने गणेश याच्या पश्चिम बंगाल येथील घराची माहिती काढली.

### ...खुणेमुळे बिंग फुटले

पोलिसांच्या पथकाने पश्चिम मेदीनपूर जिल्ह्यातील संनदेयूली गावात जाऊन गणेशच्या घरावर छापा टाकला. गणेशप्रमाणे दिसणारी व्यक्ती पोलिसांच्या नजरेस पडली. मात्र त्याने 'तो मी नव्हेच' असे पोलिसांना सांगितले. अटक केली त्यावेळेचा फोटो पोलिसांकडे होता. त्यामध्ये गणेशच्या चेहऱ्यावर जुन्या माराची खूण होती. पोलिसांनी हा फोटो त्याला दाखवताच अनेक वर्षे मृत्यू झाल्याचे भासवून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या गणेशचे बिंग फुटले.

CMYK




# Sunday Morning

सुराज्य सोलापूर

रविवार, दि. ७ मे २०२३







# महानाट्य

## कात्रजचा घाट...

कात्रजचा घाट हा शब्दप्रयोग इतिहासकालीन प्रसंगातून आला आहे. पण आपले राजकारणी लोक याचा वापर सर्रासपणे राजकीय रणनीतीसाठी वापरत असतात. विशेष करून राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका करताना हा शब्दप्रयोग विरोधक हमखास करत असतात. पवारांची नीती कात्रजचा घाट दाखवणारी असते, असे विरोधक म्हणत असतात. पवार हे राजकारणातले चाणक्य आहेत. याची प्रचिती उभ्या महाराष्ट्राला त्यांच्या अनेक राजकीय डावपेचातून आली आहे तसेच कात्रजचा घाट दाखवण्यात माहीर असणारे राजकीय नेते म्हणून देखील पवार यांचा राजकारणात उल्लेख होतो. विशेष म्हणजे कात्रजचा घाट दाखवणे ही म्हण राजकीय वर्तुळात नेहमीच वापरली जाते. पण कात्रजचा घाट दाखवणे ही म्हण नेमकी आहे काय? या म्हणीचा अर्थ काय? आणि ऐतिहासिक संदर्भ काय? हे आजच्या पिढीला माहीत करून द्यावे लागेल. या म्हणीला एक ऐतिहासिक संदर्भ आहे. खरे तर शाहिस्तेखानाला अद्दल घडविण्यासाठी शिवाजी महाराजांनी गनिमी कावा केला. त्यावेळी घडलेल्या घटनेतूनच कात्रजचा घाट दाखवणे या म्हणीची उत्पत्ती झाल्याचे सांगण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराजांसमोर औरंगजेबाचा मामा म्हणजे शाहिस्तेखान सारखा मोठा सरदार होता. बंगालचा सुभेदार असलेल्या शाहिस्तेखानाला समोरासमोर हरवणे तितकसे सोप्पे नव्हते. कारण प्रचंड सैनिक हाताशी असलेला शाहिस्तेखानला सहज हरवता येणार होते. त्यामुळे क्लृप्त्या लढवून शाहिस्तेखानाला हरवता येईल, याची कल्पना शिवाजी महाराजांना होती. शाहिस्तेखान छत्रपती शिवाजी महाराजांना अटक करण्यासाठी आला होता. शाहिस्तेखानाने चाकणचा किल्ला जिंकून आपल्या लवाजम्यासहित पुण्यात मुक्काम ठोकला होता. पुण्यात तळ ठोकलेला शाहिस्तेखान काही केल्या हलायला तयार नव्हता. दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराज तेव्हा सिंहगडावर मुक्कामी होते. लालमहालात राहणाऱ्या शाहिस्तेखानला समोर जावून हरवणे अशक्य होते. मग छत्रपती शिवाजी महाराजांनी एक शक्कल लढवली आणि ही योजना शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा भाग होती. लालमहालात राहणाऱ्या शाहिस्तेखानाला धडा शिकवण्यासाठी शिवाजी महाराजांनी लग्नाचा आसरा घेतला होता. शिवाजी महाराजांसह मोजकेच मावळे देखील होते तर लाल महालाची सर्व माहिती असलेले शिवाजी महाराज महालात घुसले होते. त्यानंतर महालात एकच धावपळ सुरू झाली होती. शाहिस्तेखानही पळून जाण्याच्या तयारीत होता. याचवेळी शिवाजी महाराजांनी संधी साधली आणि वार केला. यामध्ये शाहिस्तेखानाची बोटे तुटली आणि ही माहिती शाहिस्तेखानाच्या फौजेलाही मिळाली. दरम्यान शाहिस्तेखानाच्या इतक्या मोठ्या फौजेचा सामना करणे शक्य नव्हते. महाराजांनी मावळ्यासाहित सिंहगडचा रस्ता धरला. शाहिस्तेखानाच सैन्य शिवाजी महाराजांच पाठलाग करत होते. या सैन्याला चकवा देण्यासाठी शिवाजी महाराजांनी क्लृप्ती लढवली. शिवाजी महाराजांनी बैलाच्या शिंगाला पेटत्या मशाली बांधल्या आणि बैल कात्रज घाटाच्या दिशेने सोडून दिले. शाहिस्तेखानाचे सैन्य कात्रजच्या दिशेने गेले आणि महाराज सुखरूप सिंह गडावर पोहोचले. शिवाजी महाराजांच्या या गनिमी काव्यामुळे कात्रजचा घाट दाखवण्याची म्हण रूढ झाली.

पवारांचे समाजकारण सरळमार्गी ठरले आहे पण राजनीतीत त्यांनी सतत कात्रटचा घाट ही नीती अवलंबून विरोधकांची पळताभुई थोडी केली. त्यामुळे भले भले नेते आजही पवारांच्या राजकारणावर विश्वास ठेवायला तयार नसतात. अजितदादा हे ४० आमदार घेवून भाजपात जाणार,अशी बातमी उठवली गेली. यामागे भाजपा नेत्यांचा हात होता हे शरदरावांना ठाऊक होते.भाजपा नेत्यांना इंगा दाखवण्यासाठी पवारांनी पद्धतशीर गेम केली. अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय जाहीर करून पवारांनी एका दगडात दोन पक्षी मारले.या निर्णयाने भाजपाच्या नेत्यांना आनंदाच्या उकाळ्या फुटल्या. कारण आता राष्ट्रवादी फुटणार,असा त्यांचा समज झालेला होता.पण पवारांच्या नीतीपुढे अजितदादांसह भाजपाचे नेते तोंडावर आपटले.चारच दिवसात आपला निर्णय फिरवून पवारांनी अध्यक्षपदाची धुरा स्वतःकडे घेतली. या घडामोडीत अजितदादा एकटे पडले. नेते आणि कार्यकर्ते पवारांच्या पाठिशी उभे राहिले. पवारांची ताकत दिसून आल्याने अजितदादांना नमते घ्यावे लागले. आता पक्षांतर बंदी कायद्यामुळे आमदार फुटू शकणार नाहीत. त्यामुळे भाजपाचा डाव उधळला गेला आहे.पवारांची ही खेळी 'कात्रजचा घाट' च्या नीतीत परफेक्ट बसणारी आहे.

●●●

## वादळ शमले,पण...

पवारांच्या निर्णयाने राष्ट्रवादीत उठलेले वादळ शमले पण त्यातून अनेक प्रश्न गंभीर होणार आहेत.त्यामुळे पवारांना येत्या काळात बरीच काळजी घ्यावी लागणार आहे तसेच भाकरी लवकरात लवकर फिरवावी लागणार आहे. पवारांचे उत्तराधिकारी कोण? यावरून पवार फॅमिलीतच दंगाफसाद सुरू आहे हे २ मे रोजीच्या प्रसंगातून दिसून आले आहे. पक्ष ताब्यात घेण्याची अजितदादांची महत्वाकांक्षा त्या प्रसंगातून लपून राहिलेली नाही तर त्यानंतरच्या ज्या घडामोडी झाल्या, त्यात आमदार आणि नेते पक्षाध्यक्ष म्हणून पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे यांना पसंती दिली. यावरून उत्तराधिकारी कोण असेल? या प्रश्नाचे उत्तरही महाराष्ट्राला मिळाले आहे.

## मी यावर काय करू?

पक्षप्रमुखाचे संघटनेकडे दुर्लक्ष झाल्यास पक्षाची अवस्था काय होते हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रसंगातून दिसून आले आहे. भाकरी फिरवावी लागते नाहीतर ती करपते,असे पवार नेहमीच म्हणत असतात पण खुद्द त्यांनाच या सिद्धांताचा विसर पडला की काय? वेळीच भाकरी त्यांनी फिरवली नाही. त्यामुळे पक्षात बंड होण्याची नामुष्की ओढवणार होती परंतु सुदैवाने ती टळली. शुक्रवारी वार्ताहर परिषदेत पवारांच्या वर्मी लागणारा एक प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा पवार गडबडले. ५६ वर्ष राजकारणात सक्रीय असून आणि २४ वर्ष राष्ट्रवादीचे अध्यक्ष असून या काळात तुम्ही तुमच्यासाठी बॅकअप (उत्तराधिकारी) तयार करू शकला नाहीत, याकडे तुम्ही कसे पाहता? असा प्रश्न शरद पवार यांना विचारल्यावर पवार म्हणाले. इथे माझ्याजवळ बसलेले सर्वजण हा माझा बॅकअपच आहे. ही सर्व मंडळी माझा बॅकअप आहेत. ही मंडळी राज्य चालवू शकतात, इतकंच काय देशही चालवू शकतात. या सर्वांना संधी मिळावी म्हणून तर मी मागे जाणार होतो. पण यांनी एकलं नाही, मी यावर काय करू. अजून एक प्रतिप्रश्न झाला. किती दिवसात तुम्ही तुमचा उत्तराधिकारी तयार कराल? यावर शरद पवार म्हणाले, उत्तराधिकारी वगैरे असं काही राजकीय पक्षात नसतं. असं ठरवलं जात नाही. पक्षात काही जागा रिक्त होतात, त्या जागांचे काय करायचे, त्या ठिकाणी कोणाची नियुक्ती करायची याबाबतचा निर्णय सहकारी घेतात. मुळात राजकारणात एखाद्या व्यक्तीचा उत्तराधिकारी असू शकत नाही. उत्तराधिकारी अशी संकल्पनाच नसते.

## सूचक इषारा

पक्षाध्यक्षपदी कायम राहताना संघटनेत बदल करण्याचे सुतोवाच शरद पवार यांनी केल्याने राज्य राष्ट्रवादीत कोणते बदल होणार याची पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. भाकरी फिरवली नाही तर करपते असे पवार नेहमीच सांगतात. अलीकडेच त्यांनी पक्षात भाकरी फिरविण्याची वेळ आल्याचे विधान केले होते. त्यानंतर त्यांनी स्वतःच पक्षाध्यक्षपद सोडण्याची घोषणा केली. निवृत्तीचा विचार मागे घेतला असला तरी पक्षातील असंतुष्ट नेत्यांना सूचक इशारा दिला. पक्षात कोणतेही पद आणि जबाबदारी सांभाळण्याकरिता उत्तराधिकारी निर्माण होणे आवश्यक असते, अशी भूमिका पवारांनी मांडली आहे. तसेच संघटनात्मक बदल करण्याचे जाहीर केले आहे. जिल्हा पातळीवर वर्षानुवर्षे काम करणाऱ्यांना राज्य तर राज्य पातळीवर अनेक वर्षे काम केलेल्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी दिली जाईल, असेही पवार यांनी जाहीर केले.

## कार्यकर्त्यांची उत्सुकता...


राज्य राष्ट्रवादीत कोणते बदल होणार याचीच कार्यकर्त्यांना उत्सुकता आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या कारकिर्दीस पाच वर्षे पूर्ण झाली तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरशिवाय होण्याची शक्यता नाही. यामुळे नवीन प्रदेशाध्यक्ष नेमला जाऊ शकतो. याशिवाय संघटनेत अनेक वर्षे पदाधिकारीपद भूषविणाऱ्यांना बदलले जाऊ शकते. नवाब मलिक यांच्या अटकेपासून गेले वर्षभर मुंबई राष्ट्रवादीचे अध्यक्षपद रिक्त आहे. तेथेही नव्या चेहऱ्याला संधी द्यावी लागेल. याशिवाय पक्षाची ताकद वाढविण्याची गरज असलेल्या भागांमध्येही संघटनात्मक बदल केले जातील. जयंत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील आदी पहिल्या फळीतील नेत्यांकडे राष्ट्रीय पातळीवरील जबाबदारी सोपविली जाण्याची शक्यता आहे. सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड यांची यापूर्वीच राष्ट्रीय पातळीवर पदाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली होती.

## पत्रकारांना झापले...

पवार हे जितके शांत तितके कधीकधी उसळतातही. प्रेस कॉन्फरन्समध्ये अडचणीचे प्रश्न आले की पत्रकारांनाही झापायला ते हयगय करत नाहीत. त्याचाही अनुभव शनिवारी बारामतीत आला. अध्यक्षपदाची धुरा परत हाती घेतल्यानंतर ते प्रथमच आपल्या मायभूमीत आले. तिथेही पत्रकारांनी त्यांना गाठले. पक्षाच्या गोंधळात सगळ्यांच्या लक्षात राहिले ते अजितदादा. त्यांचा एकट्याचाच वेगळा सूर होता. ते शरद पवार यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या पत्रकार परिषदेला उपस्थित नव्हते. ते दिल्लीला गेल्याच्याही बातम्या आल्या. दुपारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी राहून राहून अजित पवार यांचा प्रश्न विचारला. त्यावर पवार जरासे चिडलेले पाहायला मिळाले. त्यांनी अजित पवार यांच्यावरील प्रश्नाला फटकारले आणि अजितदादांच्या बाबतीत चुकीचे वृत्त पसरवू नका,अशा शब्दात बजावले. अजितदादा हे वेगाने कामे करण्यात प्रसिद्ध आहेत, असा दाखलाही त्यांनी दिला.

## पवारांसोबत यंग ब्रिगेड; नेमके कसले संकेत

पत्रकार परिषदेत शरद पवार यांच्या मागे बसलेली यंग ब्रिगेड सर्वांचे लक्ष वेधणारी होती. यामध्ये आमदार रोहित पवार यांची शरद पवार यांच्याकडे असलेली नजर चर्चेचा विषय बनली होती.रोहित पवार यांच्यासह सक्षणा सलगर, संग्राम जगताप, सोनिया दुहन, आप्पा पाटील व अन्य तरुण कार्यकर्ते शरद पवार यांच्या मागे बसले होते, तर काहीजण उभे होते. शरद पवार यांच्या शेजारी सर्व अनुभवी दिग्गज नेते बसले होते. शरद पवार यांच्या उजवीकडे जयंत पाटील तर डावीकडे प्रफ्फुल पटेल बसले होते. त्यामुळे शेजारी अनुभवी नेते तर पाठिमागे यंग




ब्रिगेड अशी मांडणी करुन शरद पवार यांनी नेमका काय संदेश देण्याचा प्रयत्न केला याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. महत्त्वाचे म्हणजे तरुणांना संधी द्यायला हवी. तरुणांनी राजकारणात पुढे यायला हवे. नेतृत्त्व बदलायला हवे, असे अनेक मुद्दे शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडले. परिणामी शरद पवार यांची ही पत्रकार परिषद राजकीय विश्लेषकांनाही अचंबित करणारी ठरली. पवार यांनी राजीनाम्याची घोषणा केल्यानंतर या राजीनाम्याला विरोध करणाऱ्यात यंग ब्रिगेड आघाडीवर होती. अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राजीनामा दिला. तसेच शरद पवार यांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी आग्रहाची मागणी यंग ब्रिगेडने केली होती.

●●●

## 'पॉवरनाट्य'

- शंकर जाधव



गेल्या २ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी अध्यक्षपदावरुन पायउतार होण्याच्या 'पॉवरनाट्या' ची पुडी सोडली पवारांच्या अध्यक्षपदाच्या निवृत्तीने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चांगलाच हलकल्लोळ माजला. जो ते काय होईल?, याबाबत तर्कवितर्क मांडू लागला. आणि शेवटी तेच झाले. गेल्या ६३ वर्षाच्या राजकारण आणि समाजकारणात शरद पवारांनी असे अनेक डाव-प्रतिडाव टाकले आणि ते यशस्वी करुन दाखविले. त्यांचे अध्यक्षपदाचे राजीनामानाट्य हा त्यातलाच एक डाव. असाच डाव यापूर्वी शिवेसनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दोन वेळा टाकला होता. त्यावेळी बाळासाहेबांपुढे आपल्यानंतर आपला वारसदार मुलगा का पुतण्या? असा प्रश्न पडला होता. अगदी तसाच प्रकार शरद पवार यांच्यापुढे मुलगी की पुतण्या? असा प्रश्न पडला, हे विशेष. त्यांनी समिती नेमून समितीवरच निर्णय सोपवला. पण शरद पवारांनी टाकलेल्या डावावर कुणी प्रतिडाव टाकण्याअगोदर स्वत:हून राजीनामा मागे घेऊन या नाट्यावर पडदा टाकला. १९६० पासून शरद पवार हे राजकारणात व समाजकारणात वावरत आहेत. आजही त्यांचा कामाचा आवाका तरुणाईला लाजेवल असा आहे. १९६७ साली त्यांनी अगदी तरुण वयात विधानसभेत एंट्री केली. तेव्हापासून आजवर सत्तेतील पदे त्यांच्यामागे धावतच आली. राजकारणात त्यांच्याबाबतीत 'त्यांच्या पोटात एक, आणि ओठात एक असते' असेच म्हटले जाते. आणि ते खरे आहे. त्यांच्या मनात असले तर एकाची वाजवली तर वाजवलीच, असे त्यांच्या कार्याचा पसारा पाहता दिसून येते.

१९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली. तेव्हापासून आजगायत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद अत्यंत कुशलतेने ते सांभाळत आहेत. पक्षाच्या स्थापनेपासून अनेक चढउतार आले. २०१९ आला अजितदादांनी भाजपाशी घरोबा करुन पहाटेचा शपथविधी केला तेव्हा ते कमालीचे अस्वस्थ झाले होते. पण अत्यंत चाणाक्षपणे त्यावर त्यांनी मात करुन अजितदादांचे वादळ शांत केले. आता अलिकडील काळात अजितदादा पुन्हा काहीतर घोळ घालणार?, अशी कुणकुण लागताच शरद पवारांनी स्वत:च्या अंगावर डाव टाकला. तो पक्षाच्या राजीनाम्याचा. यावर पक्षातंर्गत अणि पक्षाबाहेरील लोकांचे प्रतिडाव कसेकसे पडतात, हे ते गेल्या चार दिवसांपासून पहात होते. शेवटी आपणच आपल्या अंगावर टाकलेल्या डावाचा धूळ झटकून त्यांनी राजीनामा मागे घेऊन समोरच्यांचे प्रतिडाव पडण्यापूर्वीच हाणून पाडले आहेत.

खरंतर आपल्यानंतर पुढे कोण?, हा जटील प्रश्न त्यांच्यासमोर होताच. यातून मार्ग काढण्यासाठी पक्षातील नेत्यांची समिती नेमून समितीनेच निर्णय घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली. या समितीने अपेक्षेप्रमाणे त्यांचा राजीनामा फेटाळून लावीत, शरद पवार हेच अध्यक्षपदी कायम राहतील, असा निर्णय दिला. या समितीचा निर्णय शिरोधार्ह मानून शरद पवारांनी लागलीच आपला अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घेत असल्याचे जाहीर केले. हे करताना पक्षात नवे नेतृत्व निर्माण करण्याचा आपला प्रयत्न राहील, हे सांगण्यास ते विसरले नाहीत. त्यामुळे आगामी काळ काय सांगेल, असे आताच वर्तवणे कठीण आहे.

●●●

## पुढच्या रणनीतीची तयारी...

आता पुढची रणनीती काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पक्षाच्या अध्यक्षपदी पुनर्नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी केंद्रपातळीवर लक्ष द्यायला सुरुवात केली आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी विरोधकांच्या एकजुटीसाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले आहे. येत्या १०-११ महिन्यांनंतर सर्वत्र निवडणुकांचा माहोल सुरू होईल. त्या काळात इतर प्रश्न बाजूला राहतात आणि निवडणुका अग्रस्थानी येतात, असे शरद पवार म्हणाले. नितिश कुमार, अरविंद केजरीवाल, के. चंद्रशेखरराव, ममता बॅनर्जीसह अनेक नेते विरोधकांच्या एकजुटीसाठी प्रयत्न करत आहेत. कॉमन मिनिमम प्रोग्रॅम तयार करून विरोधकांना एकत्रित आणण्यासाठी माझा सहभाग असेल, असंही शरद पवार म्हणाले. म्हणजेच, केंद्र पातळीवर मोदी सरकारविरोधात विरोधकांची मोट बांधण्याकरता शरद पवार पुन्हा महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

## सवयीप्रमाणे शब्द फिरवला



पवारांनी राजीनाम्याच्या बाबतीत घुमजाव केल्याने विरोधकांकडून टीका होणे स्वाभविकच आहे. पवारांवर पहिला बाण भाजपाचे नेते तथा राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सोडला आहे. सवयीप्रमाणे पवार यांनी आपला शब्द फिरवल्याची टीका विखेंनी नगर येथे बोलताना केली. पवारांनी म्हटले होते की भाकर फिरवली पाहिजे. मात्र त्यांनी आपल्या सवयीप्रमाणे निर्णय फिरवला आहे.

## बंड शमवण्यासाठीच हा ड्रामा..



राष्ट्रवादी काँग्रेसच्या या घडामोडीवर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट म्हणाले की, या संपूर्ण राजीनामा नाटकात सर्वात मोठी भूमिका पवारांच्या सहकाऱ्यांनी निभावली. पवारांनी पक्षांतर्गत लोक आणि जे कुणी विरोध करत आहेत, त्यांचा या राजीनामा नाट्यात करेक्ट कार्यक्रम केला. आता पुन्हा अशी हिंमत कराल तर मी माझा बडगा तुम्हाला दाखवीन, असा इशारा पवारांनी या राजीनामा नाट्यातून दिला आहे. या संपूर्ण घटनेतून शरद पवार यांनी आपल्या ताकदीची परीक्षा घेतली तसेच पक्षांतर्गत बंडाळीची जी चिन्हे दिसत होती, त्याला शमवण्यासाठी केलेले हे एक प्रकारचे नाटक जरी असले, तरी तो एक इशारा त्यांनी या माध्यमातून दिला आहे. पवार हे मोठे राजकारणी आहेत. त्यांनी योग्य वेळी टाकलेली ही गुगली होती. शरद पवार हे एवढे साधे नाहीत. त्यांनी यातून अनेकाचा करेक्ट कार्यक्रमही केला. अजितदादांना भाजपाच्या आश्रयाला घेण्यास शिरसाट यांनी विरोध केला होता.

संकलन व संपादन : पुरुषोत्तम कुलकर्णी | मांडणी व सजावट : आनंद उपरे

CMYK